# सारथी

## दीपावली २००९



सियॅटल् महाराष्ट्र मंडळ





अनुक्रमणिका



शुभेच्छा – रोहित चाफेकर, अध्यक्ष,सिॲटल महाराष्ट्र मंडळ ......२
कार्यकारिणी ........................................................ ३


**मराठी लेख, कथाः**


सत्ता – सौ माधूरी शहा ........................................... ४
राखी पौर्णिमेनिमित्त कविता ....................................... ७
स्वप्नसाकार – बाळ ठाणेदार ...................................... ८
बिनफळ्याचा क्लास – प्रभाकर बोकिल.............................१७
पाहूणचार – सौ माधूरी शहा .........................................१९
सायंकाळी कातरवेळी – डॉ. शैला कोदे ............................ २२
जत्रा ........................................................................ २४
नववा अध्याय – अरूण निसरगंड ..................................... २६
अव्हॉईड प्लास्टीक – सुधीर मेथेकर ..............................३१
सतारीचे बोल – अरूण निसरगंड ................................... ३३
संक्रमण – सौ. माधूरी शहा .......................................... ३६
माझी माय – उषा आडंगावकर .......................................३८
कस्तुरी – सौ. माधूरी शहा .......................................... .४०
तेथेही कर माझे जुळती – सौ. मालती मुकुंद आगाशे ........ ४२
सेतु – सौ. माधूरी शहा ............................................... ४४


**English Articles, Poems :**


Everything He Does – Meera Limaye ......................... ४६
-Rasika ..........................................४७
Story – Nishant Limaye ...................................................४८
Dream (poem) – Milinda Bhoptkar .............................. ४८
21 Kms. – Parikshit Pol ....................................................४९
India' future-Its youth power-Dr.Manisha Nerkar.......५२
-Sanjana Galgalikar ..................५४
Sunny Days (Poem) – Milinda Bhopatkar.....................




# सारथी २००९


संपादक : कशिश पोळ
अंकरचना व सजावट : कशिश पोळ
छपाई व्यवस्थापन : कशिश पोळ
मुद्रक : किंकोज प्रिंटर्स

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम तुम्हासर्वांना या दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा. दरवर्षीप्रमाणे यंदाही ही दिवाळी तुम्ही ऊत्साहाने साजरी केली असेल अशी आशा करतो.

मंडळाच्या परंपरेनुसार या वर्षाची सुरुवात जानेवारी महिन्यात 'वासंतिक हळदीकुंकू व खादयमेळा' या कार्यक्रमाने झाली. जवळपास दीडशेहून अधिक लोकांची ऊपस्थिती आणि लहानांपासून ते मोठयांपर्यंत सर्वांना सामावून घेणारे एक मिनिटांचे चुरशीचे खेळ हे याचे वैशिष्टय. फेब्रुवारी महिन्यात कोणता कार्यक्रम करायचा हे ठरवित असतानाच हिंदुस्थानातील तरुण कलाकार डॉ. सलील कुलकर्णी व संदीप खरे यांचा "आयुष्यावर बोलू काही" या कार्यक्रमाचा प्रस्ताव आला आणि केवळ १० दिवसांत आखणीपासून ते सुसंबद्ध आयोजन करुन एक नवाच विक्रम केला. या कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजे फक्त सियॅटल नव्हे तर व्हॅन्कूवर, कॅनडा व पोर्टलंड मधील रसिकांची उपस्थिती. आणि योगायोग समजा पण कार्यक्रमाच्या दुस-या दिवशीच त्यांना झी अवॉर्डस मधे पुरस्कार दिल्याचे घोषित करुन सन्मानित केले गेले. मार्च महिन्यात झालेल्या "होळी हंगामा" या कार्यक्रमात मंडळाच्या सभासदांनी त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करीत उपस्थित असलेल्या दीडशे प्रेक्षकांची करमणूक केली. कितीतरी नवोदित कलाकारांची ओळख या निमित्ताने झालेली दिसली. मे महिन्यामध्ये आयोजित केलेल्या "ट्विन फॉल्स हाइक" मधे २० ते २५ उत्साही मंडळींनी भाग घेतला. जून महिन्यात या वेळी दोन दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. इथल्या स्थानिक कलांकारांनी स्थापन केलेल्या "स्वराली" या गायन समूहाने मराठी भाषेतील विविध प्रकारची गाणी गाऊन ऊपस्थित रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाला झालेली सव्वा दोनशे लोकांची ऊपस्थिती त्यांच्या कलागुणांना वाव देऊन गेली. याच महिन्यातील दुसरा दर्जेदार कार्यक्रम म्हणजे मराठी चित्रपट "मी शिवाजीराजे भोसले बोलतोय". मराठी माणसाची महाराष्ट्रात होत असलेली ससेहोलपट या संवेदनशील पण महत्त्वाच्या विषयावर याची कथा आधारीत आहे. यावेळी मंडळाच्या इतिहासात प्रथमच मराठी चित्रपटाचे दोन खेळ आयोजित करुन एक नवा पायंडा घालून दिला. आणि या दोन खेळांना पाचशे प्रेक्षकांची उपस्थिती हा आणखी एक विक्रम. जुलै महिन्यात झालेल्या "उन्हाळी सहली" चा आनंद बालगोपालांपासून ते थोरामोठयांपर्यंत जमलेल्या सव्वाशे सभासदांनी अनुभवला. या दिवशी आपल्या युवा मंडळाने आखलेले विविध खेळ सर्वांच्या पसंतीस उतरले. ऑगस्ट महिन्यात झालेल्या "गणेशोत्सवा"च्या कार्यक्रमात इथल्या बालकलाकारांनी आपल्या विविध गुणांचे प्रात्यक्षिक उपस्थित असलेल्या दोनशे लोकांना सादर करुन त्यांची वाहवा मिळविली. सप्टेंबरमधे झालेल्या "कोजागिरी व दांडिया" कार्यक्रमाचा आनंद शंभरहून अधिक लोकांनी लुटला.



या वर्षी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताना दोन गोष्टींवर लक्ष केंदीत करायचे ठरविले ते म्हणजे एकूण सभासदसंख्या दोनशेवर न्यायची आणि गेली काही वर्षे समितीवर काम करीत असताना समितीला सतत विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे उत्तर द्यायचेः "मी भरत असलेल्या सभासदस्यत्वाच्या शुल्काच्या बदल्यात मला काय मिळणार?". त्यानुसार त्यांनी खर्च केलेल्या पैशांच्या पुरेपूर मोबदला (खकेपैचापुपूमो) कसा मिळेल या दृष्टीने सतत प्रयत्न करुन एक दोन नव्हे तर तब्बल ६ कार्यक्रम विनामूल्य दिले. आणि त्याचबरोबर सभासदसंख्या दोनशेच्या आसपास नेऊन ते पण उद्दिष्ट साध्य केले. परंतु हे सर्व कार्यकारी समितीवर काम करीत असलेल्या माझ्या सहका-यांच्या कसलीही अपेक्षा न करता आपला वेळ आणि श्रम खर्च करण्याच्या वृत्तीमुळेच साध्य झाले. दरवर्षी वाढणारे सभागृहांचे दर आणि इतर खर्च पाहून मला एक विनंती कराविशी वाटते ती अशी की यावर्षीप्रमाणे दरवर्षी आपण मोठया संख्येने सभासदस्यत्व स्वीकारुन मंडळाला हातभार लावा. तसेच प्रत्येक कार्यक्रमाला तुमची असलेली मोठया संख्येची उपस्थिती आम्हाला जास्तीत जास्त दर्जेदार कार्यक्रम सादर करण्यास सहाय्य करेल.

या वर्षी मला संधी दिल्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार. आशा आहे की तुमच्या अपेक्षेस पात्र ठरतील असे दर्जेदार कार्यक्रम आपणांस सादर करु शकलो.
कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला विनम्र,
रोहित चाफेकर

महाराष्ट्र मंडळ सियॅटल

# Executive committee 2009



Front Row (Left to Right) : Sunita Paul,Gauravi Kulkarni,
Swapna Vaidya, Amruta Shah, Kashish Pol,
Dr.Shaila Kode, Hema Thanedar,
Amruta Deshpande

Back Row (Left to Right) : Chetan Chudasama,Rohit Chaphekar,Amol Koshe
Not in the photo : Mugdha Daptardar

॥ श्री ॥

प्रिय वाचकहो,

आपल्या सगळयांना दिवाळीच्या शुभेच्छा! ,

सारथी **२००९** हा अंक आपल्या समोर आणताना मला अत्यंत आनंद होत आहे. सिअॅटलच्या अनेक लेखकांच्या लेखणीतून उतरलेले उत्तमोत्तम लेख एकत्र करण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. लहानग्या लेखकांचा व कवींचाही यात सहभाग आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

या अकांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादिका सहभागी आहेतच असे नाही. कृपया अधिकृत परवानगीशिवाय या अंकातील साहित्य पुनर्मुद्रित करू नये ही नम्र विनंती. हा अंक बनवताना काही त्रुटी, चुका राहणार नाहीत याची आधिकाधिक काळजी घेतली गेली आहे. तरीही जर आपल्याला यात काही चुका आढळल्या, तर आम्ही दिलगीर आहोत.

हा अंक आपल्याला आवडेल आशी आशा आहे. त्याचप्रमाणे तो आपल्याला कसा वाटला, त्यात काय सुधारणा अपेक्षित आहेत, याबद्दलचे आपले मत आम्हाला नक्की कळवा.

धन्यवाद !!
संपादिका

# सत्ता

निवडणुका व त्याच्या तारखा जाहीर झाल्या. वाटलं चला मतदानाच्या निमित्तानं सुट्टी मिळेल. तेवढाच आराम. पण हा माझा आनंद काही फार काळ टिकला नाही.

घरी गेलो तर तिथे निळूभाऊ व गजाभाऊ बसलेले दिसले. मला पाहताच ठेक्यात म्हणाले "याऽ याऽ आण्णासाहेब! तुमचीच वाट पाहत होतो."

मी म्हटलं, "का बुवा? आज या गरीबाची वाट?"

"अहो निवडणुका जाहीर झाल्यात. आम्ही उमेदवार शोधत होतो. निळूभाऊंनी तुमचं नाव सुचवलं. मग आलो इकडं." गजाभाऊ म्हणाले.

"छे हो, आम्ही मास्तर, आम्ही कसले होतोय उमेदवार!"

"आहो, हाय काय त्या नोकरीत? द्या की लाथाडून! उद्या निवडून आलात तर असले पाच-पंचवीस मास्तर येतील की तुमच्या हाताखाली!" - निळूभाऊ.

"नको नको! मला तुमची उमेदवारी पण नकोय अन् हाताखालची माणसंही." मी जरा तोडूनच बोललो.

तरीही दोघे गळ घालायला लागले, पण शेवटी मी ठाम आहे हे पाहून निळूभाऊ म्हणाले, "अण्णांच्याऐवजी वैनीन्ला हुबं केलं तर?"

"हांऽ! अगदी बरोब्बर बोललात बघा निळूभाऊ!"

गजाभाऊ बोलले. "म्हंजे कसं?, त्या विमलीला शह दिल्यासारखं हुईल, लई तोरा हाय तिजा!"

मग दोघेही हिच्या पाठीमागे लागले. एवढा वेळ गप्प असलेली आमची ही म्हणाली, "भावजी, मला काय कळतं त्या राजकारणातलं? मला नकोय ते झंझट!"

"अहो वैनी, तुमी नुस्तं व्हय म्हना. बाकीचं सगऽळं आम्ही बगून घिऊ. प्रचार, निधी, कचेरीत जायचं, चिन्नं आनायचं, काय म्हनून काय तुम्माला बगावं लागाचं न्हाय, फकस्त तुम्ही व्हय म्हना."

"अरे काय व्हय म्हणा? कुणी मत तरी द्यायला नको का? विनाकारण डिपॉझिट जप्त व्हायचं" मी म्हणालो.

तसं लगेचच निळूभाऊ बोलले, "अहो हितं कुनाला जग जिंकायचंय? आपल्याला निस्ती त्या विमलीची मतं फोडायचीत."

"मग तुम्हीच उभे राहा ना", मी कंटाळून म्हणालो.




"गेल्या बारीनं हुबाच व्हतो, पन आपटलो ना! म्हून तर या बारीनं दुसरा उमीदवार हुडकतुया. वैनी, एकदाच हुबं र्‍हावा, पुन्ना कंदी आग्रं धरावचो नाय..."

होय, नाही करीत शेवटी एकदाचा कचेरीत जाऊन हिचा अर्ज भरला गेला. हां हां म्हणता सगळीकडे बातमी पसरली. शाळेमध्ये तर माझा भाव एकदमच वधारला. जो तो "हं, काय पाटील, बायकोला पुढं करून तुम्ही राजकारणात शिरलात म्हणे? आता काय बुवा आम्हाला विसरणार?" असे म्हणू लागला.

"अहो, कसलं विसरणं आलंय? हिच्या उभं राहण्यानं टेन्शन मात्र आलंय" असे माझे त्याला उत्तर असे.

निळूभाऊ व गजाभाऊ ही जोडी तशी बिलंदर! संधीसाधू! आणी हिला तसा काही आचपेच कळत नव्हता. त्यामुळे मला जागरूक राहणं भाग होतं. अर्ज भरल्यापासून दोघांच्याही आमच्या घरच्या चकरा वाढल्या होत्या. वेगवेगळी मंडळं दाखल होत होती. अर्ज भरल्यानंतर आठवड्याभरातच दोघे आले. दोघांत नेहमी निळूभाऊंचा पुढाकार असे. म्हणाले, "वैनी, आता लौकरच प्रचाराचा नारळ फोडला पाहिजे बरं का? म्हंजे इग्याईरातीसाठी निधी गोळा करता ईल. आदी देवीला नारळ फोडू अन् सगळे मिळून निदी गोळा कराया जाऊ."

खरं तर हिच्या पक्षाच्या प्रचारापेक्षा दोघांनाही निधीतच जास्त इंटरेस्ट होता हे मी जाणत होतो. पण आता ते म्हणतील त्याला हो म्हणणं भाग होतं. त्यात निळूभाऊ स्वतः याआधीची निवडणूक लढल्यामुळे (की पडल्यामुळे?) राजनीतीचे डावपेच त्यांना चांगलेच माहीत होते.

विमलताई (निळूभाऊंची इमली) गेल्या निवडणुकीत निळूभाऊंवर मात करून प्रचंड मताने निवडून आल्या होत्या. म्हणून तर यावेळी त्यांना विमलीवर विजय मिळवायचा होता. एकेदिवशी सकाळीच निळूभाऊ आले अन् म्हणाले, "वैनी, जरा कुक्कू आना बरं आतनं, चिन्न आनलंय्". हिनं हौसेनं करंडा आणला. निळूभाऊंनी घडीचा कागद हलकेच उघडला, तो पाहून ही ओरडली, "हे काय? वस्तरा?"

"अहो, त्या विमलीचं चिन्न तेलाची बाटली हाय, म्हून मुद्दाम हे चिन्न निवडलंय. आता ह्या वस्तऱ्यांनीच इरुद्ध पार्टीची हजामत करू. मग लावा म्हनावं टाळूला तेल कसं लावत्यात ते."

त्या विमलताईंच्या ईर्ष्येने का होईना निळूभाऊ हिच्याकडे जास्त लक्ष देत होते एवढं खरं.

"हं वैनी, करा सुरुवात", "चांदीच्या तबकात केशरी बुक्का, अन् वस्तऱ्यावर मारा फुलीचा शिक्का."

प्रचाराला वेग आला. हिनं हिच्या मंडळातल्या, शेजारच्या अशा १०-१५ महिलांचा गट तयार केला. शिवाय ती जोडगोळी हिच्याबरोबर होतीच. निळूभाऊंचे उपद्व्याप चालूच होते. त्यांनी कुठल्या तरी सिनेमाचा वयस्क हिरो आणून, हिच्यासमवेत त्यांचा फोटो काढून पेपरला दिला व बातमी दिली की, सुप्रसिद्ध सिनेनट सौ. कमलताई पाटलांच्या पक्षात सामील! त्यांच्याबरोबर एक सभा पण घेतली. हिला म्हणाले, "वैनी, आजच्या सभेत दुसऱ्या पक्षाला शिव्या हासडायच्या बरं का?"

"म्हणजे?" ही म्हणाली.

"अहो भाषण तेच. निस्तं पक्षाचं नाव बदललं म्हंजे झालं!"

त्या एका महिन्याच्या अवधीत हिला कित्ती अनुभव आले असतील? बरंच झालं. जरा बाहेरच्या दुनियेची तोंडओळख तरी झाली त्या निमित्तानं!

एका रविवारी शेजारच्या खेड्यात हिनं प्रचारसभेचं आयोजन केलं. मला म्हणाली, "आज तुम्ही यायचं हं." सभा दुपारी चारला होती. आम्ही वेळेतच गेलो. पण सगळा शुकशुकाट होता. "हे काय? सभा असल्याचं जाहीर केलंय ना?" मी म्हणालो.

"हे तर नेहमीचंच आहे. थोडं थांबा. भावजी सगळं व्यवस्थित करतील."

निळूभाऊ, गजाभाऊ गावात गेले अन् बघता बघता ५-२५ माणसं लगेचच गोळा झाली. हळूहळू गर्दी वाढू लागली. निळूभाऊंनी थोडी प्रस्तावना केली व हिला म्हणाले, "वैनी, चला सुरू करा!"

हिनं भाषणाला सुरुवात केली. "मतदार बंधू-भगिनींनो, मागच्या नेत्यानं या पाच वर्षात काय दिवे लावले आहेत हे तुम्ही जाणताच. तेव्हा आता जास्त काही भाषणबाजी न करता मी आश्वासन देते की, गावच्या विकासासाठी गावात पाणी, शेतीपंपासाठी वीज व वाहतुकीसाठी पक्क्या सडका करून देऊ. मी अभिवचन देते की ज्याप्रमाणे आपल्या देशाच्या संरक्षणासाठी परवा कारगिलमध्ये आपले शूर जवान ज्या शर्थीनं लढले त्याच शर्थीनं आम्ही ही निवडणूक लढवून तुमचा विकास करू. त्यासाठी प्राण गेला तरी बेहत्तर!"

अरे, रे रे, हिच्या या अफाट वक्तृत्वाने मी मात्र खजील होऊन मान खाली घालून बसलो. कशाचा संबंध कशाला लावीत होती! कारगिल, अभिवचन, प्राणाची बाजी, असले शब्द वापरल्याने आपलं भाषण भारदस्त वाटेल असं ही समजत होती की काय? तेवढ्यात लाईट गेली. मी सुटकेचा श्वास सोडला. नाहीतर आणखी कितीवेळ असली असंबंध भाषणबाजी ऐकावी लागली असती कोणास ठाऊक!

माईक बंद पडल्यामुळे हिचे फक्त हातवारे व तोंडाची हालचाल दिसायला लागली. लोकांची चाललेली चुळबूळ पाहून मी हिला खुणावलं, आटपतं घे. पण लगेच निळूभाऊ म्हणाले, "वैनी लाईट आत्ता ईल, तुमी बोलत ऱ्हावा."

लाईट आलीच नाही, पण एकंदरीत वातावरणाचा अंदाज घेऊन, पुढला अनर्थ टाळण्यासाठी आम्ही घर गाठलं.

घरी आल्यावर मी हिला चिडून म्हणालो, "बंद करा आता हा प्रचार! उगाच काही देणं न घेणं. निष्कारण डोक्याला ताप!"

ही म्हणाली, "झालं, दोन-तीन दिवसात प्रचार बंदच होईल. मग निवांतच आहे."

प्रचार बंद झाला. सगळं कसं शांत शांत वाटायला लागलं. आवाजांनी डोकं नुसतं भणाणून गेलं होतं. मतदानाच्या आदल्या दिवशी ही जोडगोळी आली व "वैनी चला बरं

जरासं आमच्याबरोबर" असं म्हणून हिला बरोबर नेलं. जाताना माझ्याकडून थोडेसे पैसे सुद्धा नेले. हिचा प्रचार सुरू झाल्यापासून माझ्याच खिशाला कितीतरी झळ बसली होती.
नेमकं कोणाला काय हवं असतं ते निळूभाऊंना माहीत असल्यामुळे ज्याला-त्याला जे-ते देऊन मंडळी उशीराने घरी परतली. मतदान शांततेत पार पडलं. मी सुटकेचा श्वास सोडला.

मतमोजणी सुरू झाली. मी हिला म्हणालो, "अगं, निळूभाऊ, गजाभाऊ कसे आले नाहीत?"

"अहो, मी पण त्यांचीच वाट पाहतेय." ही अस्वस्थ होत म्हणाली.

त्यादिवशी दुपारपर्यंत निकाल जाहीर झाले. फटाक्यांची आतषबाजी झाली अन् आवाज आला, "कमलताई पाटलांचा विजय असो."

"अऽरे" मी आश्चर्याने अवाकच् झालो.

काही का असेना, पण हिच्या विजयाचं श्रेय निळूभाऊ व गजाभाऊंनाच जात होतं. गुलाल, हार-तुऱ्यात हिची मिरवणूक काढण्यात आली. दोघेही थाटात अंगरक्षकाप्रमाणे हिच्या शेजारी उभे होते.

रात्री मी हिला म्हणालो, "अगं आता दोघेही तुझे पी. ए. होतील हं; आता तर फार सांभाळून राहावं लागेल, नाहीतर हे दोघे काय करतील याचा भरवसा नाही."

तशी ही जराश्या थाटातच म्हणाली, "अहो कांऽही काळजी करू नका. इतके दिवस वस्तरा त्यांच्या हातात होता, पण आता तो माझ्या हातात आलाय. विनाकारण मध्ये-मध्ये डोकं खुपसायला लागले तर त्या वस्तऱ्यांनीच दोघाची पण ... करेन."

"व्वा, शेरास सव्वा शेर!" मी म्हणालो.

पण लगेच तिरक्या नजरेने माझ्याकडे पाहत म्हणाली, "तेच काय, कुणीही मध्ये नाक खुपसलं तर त्यांची हीच गत होईल."

अरे बापरेऽ! आजच सत्ता हातात आलीय तर हा रुबाब? सत्तेत एवढं सामर्थ्य!

ही निवडणूक माझ्या सुद्धा अंगलट येणार की काऽय?

---- सौ. माधुरी शहा, सोलापूर.



## ओल्या नारळाच्या करंज्या

**साहित्य -** ३ वाट्या रवा, १ वाटी मैदा, १।४ चमचा मीठ, ८ चमचा पातळ डालडाचे मोहन.

**सारण -** २ मोठे नारळ, ३ वाट्या साखर, वेलची पूड, ५० ग्रॅम बेदाणा, १० ग्रॅम बदाम, थोडा रोझ इसेन्स

**कृती -** रवा, मैदा,मीठ व डालडा एकत्र करून दुधात किंवा पाण्यात घट्ट पीठ भिजवावे.साधारण तासाभराने पाट्यावर पीठ कुटून घ्यावे. व त्याच्या बेताच्या आकाराच्या लाट्या करून, ओल्या कपड्याखाली झाकून ठेवाव्यात.

खोबरे व साखर एकत्र करून अगदी मिनीटभरच गॅसवर ठेवावे. साखर विरघळली, की लगेच उतरवावे. नंतर त्यात इसेन्स, वेलची पूड, बेदाणा व बदामाची साले काढून केलेले काप घालावेत. वरील पिठाच्या पातळ पुऱ्या लाटून, त्यात नारळाचे सारण भरून, करंजीसारखे दुमडून, कडा चांगल्या जुळवून नंतर कातण्याने कापून मंदाग्नीवर तळाव्यात.

## राखी पोर्णिमेनिमित्त कविता

# नशिब

जी माणसं हवीशी वाटतात ।
ती कधीही भेटत नाही ।
जी माणसं नकोशी वाटतात ।
त्यांचा सहवास संपत नाही ॥
ज्यांच्याकडे जावेसे वाटते ।
त्यांच्याकडे जायला जमत नाही ।
ज्यांच्याकडे जाऊ नये असे वाटते ।
त्यांच्याकडे जावेच लागते ।
जेव्हा जीवन नकोसे वाटते ।
तेव्हा काळ संपत नाही ।
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो ।
तेव्हा काळ संपलेला असतो ॥
नशीब हे असंच असतं
त्याच्याशी जपून वागावं लागतं ।
तिथे कोणाचेच चालत नाही ।
जिकडे नेईल तिकडेच जावेच लागते. ॥



हिरवी अवनी सूचीत करते
श्रावण मासाची
श्रावण हळूच वरदी देतो
राखी पुनवेची
लगभग धांदल एकच उडते
साऱ्या बहिणीची
राखी धाडण्या भाऊराया
माया ममतेची

---- सौ. माधुरी शहा, सोलापूर.




पक्षी आकाशांत स्वैरसंचार करतो परंतु मानवाला ते जमत नाही ह्याचाच विषाद! पक्षाच्या शरीराचे निरनिराळे अवयव आकृति १ मध्यें दाखविले आहेत. त्याला जमीनीवरुन चालण्यासाठीं, धावण्यासाठीं आहेत पाय आणि उड्डाणासाठी आहेत पिसांचे पंख. आकृति २ मध्यें तुलना आहे मानवाची धाव आणि पक्षाची धाव ह्यांची. आपण आपल्या चालण्याकडें,धावण्याकडें निरिक्षात्मक बघितले तर आपण आपले पाय जामिनीवर दाबतो आणि मगच गतिमान होतो हे आढळून येइल. वाळूवरून चालताना पायाखालीची वाळू सरकते. त्यामुळें वाळूवरून चालणे कठिणच वाटते. आपण उडी मारून हवेंत जाऊ शकतो; परंतु कांही क्षणातच पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणामुळें पृथ्वीच्या पृष्ठभागाकडें ओढले जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर चालण्यासाठीं मानवाला बाह्य यंत्रणेची आवश्यकता नसते.

पक्षी जमिनीवर किंवा झाडाच्या फांदिवर [आकृति १ ] बसलेला असतो तेंव्हा त्याचे पंख त्याच्या अंगाभोवती घट्ट लपेटलेला असतात. पक्षाने धाव सुरू केली की तो आपले पंख पसरतो. पसरलेल्या पंखांत उत्पन्न झालेल्या उचल (लिफ्ट) मुळें जमिनीवरून आपोआपच उंच-उंच जातो. पक्षाला जमिनीवरून चालण्यासाठीं तसेच आकाश संचारणासाठीं बाह्य यंत्रणेची आवश्यकता नसते. मानवाला पंख नसल्यामुळे आकाशसंचारणासाठी योजना करणे आवश्यक आहे. एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे की कांही वर्गातील पक्षी जड जेवण झाल्यानंतर लागलीच उडू शकत नाही ह्याचे कारण आहे त्यांचे जास्त झालेले वजन आता त्यांच्या पखांना पेहलवत नाही.


मानवाला पंख नाहीत आणि त्याचे वजनहि जास्तच. त्यानें त्याचे हात आणि बोटे कितीहि पसरवली तरी त्यापासून आवश्यक ती उचल (लिफ्ट) मिळत नाही ह्याचे कारण म्हणजे पसरलेला हात आणि बोटे ह्यांचा पृष्ठभाग खूपच तोटका. पक्षाच्या पसरलेल्या पंखांचा पृष्ठभाग त्याच्या इवल्याश्या मधल्या शरीराच्या भागापेक्षा (आकृति १) कितीतरी पटीनें मोठा असतो. उचल उत्पादन होणा-या पृष्ठभागापेक्षा मध्य शरीराचा पृष्ठभाग जास्त झाला तर गतीला त्याचा विरोध (ड्रॅग) निर्माण होतो. आपण चालत असताना विरूध्द दिशेनें वरा येतो तेव्हां ड्रॅग जाणवतो; पुढें चालणे अवघडच वाटते. पक्षाची आणि मानवाची तुलना झाल्यानंतर मानव आणि मुंगी ह्यांची तुलना लक्षणीय आहे.

| | मानव | मुंगी |
|---|---|---|
| वजन | १५० पैंड | १/२० औंस |
| उचलता येणारे वजन | ३०० पौंड | १/२ औंस (१६ = १) |
| लिफ्ट / वजन = रेशो | २ | १० |

ह्याचा अर्थ मुंगी मानवापेक्षा पाचपटीनें अधिक शक्तिमान आहे मानवाला बुध्दिमत्ता अचाट आहे. ठिकठिकाणी तो शक्तिपेक्षा युक्तीच वापरतो. आकाश संचारास आवश्यक तेवढे प्रॅाँपल्शन आणि लिफ्ट पक्षी आत्मशक्तीनें पखांचे (फ्लॅपिंग) फडफडण करून उपलब्ध करून घेतो. हे निसर्गाचे दान आपल्याला नाही हे पूर्णतः जाणून मानवानें त्याच्या बुध्दिकौशलनें पंख आणि एंजिनयुक्त "विमान वाहन" (आकृति २ आणि ३) बनवून त्याच्या नियंत्रणासाठी (कंट्रोल) पायलट म्हणून त्यात तो जाऊन बसला. मदतीसाठी ऑटोपायलट तयार केला. आता तर दूरच्या प्रवासासाठी पूर्णतः ऑटोपायलटच्या नियंत्रणाखालीं मालवाहू (फ्रेटर) विमान पाठविण्याचा प्रयोग केला जाणार आहे. विमानाची माहिती करून घेताना वायुगति (एरोडायनॅमिक) शास्त्राची जी विशिष्ठ भाषा आहे त्याच्या जरूरीनुसार उपयोग करून घ्यावाच लागणार आहे. आकृति ३ मध्यें दाखवलेल्या विमानाची कांही आकडेवारी पाहू आणि त्याला अनुसरून विमानाच्या डिझाइनमध्यें वापरल्या जाणा-या कांही संज्ञांचा येथे फक्त उल्लेख करू; त्यांची आधिक माहिती योग्य ठिकाणी पुढें येणारच आहे.




आकृती 4 पक्षांच्या शरीराचे निरनिराळे अवयव




आकृति 2 : मानव आणि पक्षी

| | स्टॅबिलायझर | | |
|---|---|---|---|
| | पंख (१ आणि २) | उभा (७) | आडवा (८) |
| स्पॅन (बी) [फूट] | १९७ | ३१ | ६५ |
| क्षेत्रफळ (एस)[ फूट$^{२}$ ] | ३८८० | ४९५ | ८२५ |
| आस्पेक्ट रेशो(एआर) बी२ / एस | १० | २ | ५ |
| रूट कॉर्ड(सीआर) [इंच] | ३७६ | ३०८ | २४७ |
| टीप कॉर्ड (सीटी)[इंच] | ९२ | ९२ | ६२ |
| मीन एरोडायनॅमिक कॉर्ड (एम ए सी)[इंच] | २४७ | २१९ | १७३ |
| डायहेड्रेल[अंश] | ६ | – | ७ |
| स्वीप [अंश] | ३२ | ४० | ३६ |
| टेपर रेशो | ०.२६ | ०.३ | ०.२५ |

डावीकडच्या पखांच्या टोकापासूनचे उजवी कडच्या पखांच्या टोकापर्यंतच्या अंतराला "विंग स्पॅन" म्हटले जाते. पखांच्या पुढच्या टोकापासून पाठीमागच्या टोकापर्यंतच्या अंतराला "विंग कॉर्ड" म्हणतात.

फुग्यामध्यें गरम हवा भरली असता फुगा जमिनीवरून वर जातो ह्या तत्वावर आधारित जोसेफ आणि एटाईन माँटगॉल्फर ह्या बंधुनी एरोस्टॅट नावाचा फुगा तयार केला आणि त्यात बसून जून १७८३ मध्यें फान्सच्या ॲकेडेमी ऑफ सायान्सेससमोर हवेतील उड्डाणाचे प्रात्याक्षिक करून दाखविले गरम हवा न घालता फुग्यांत हायड्रोजन वायु घालून जे.ए.सी. चार्ल्स ह्यानी ऑगस्ट १४, १७८३ ह्या दिनी हवेंतील उड्डाणाचे आणखी एक प्रात्याक्षिक करून दाखविले.

आकाशांत पक्षासारखी भरारी मारण्याची स्वप्नें अनेकांची परंतु मानवाला ते कितपत साधेल ह्याबद्दल दाट शंकाच होती जे आस्तित्वांत आहे ते शास्त्रज्ञ शोधून काढतो. जे अस्तित्वांत नाही तें मानवातला इंजिनियर बनवितो. यशस्वी जर्मन मेकॅनिकल इंजिनियर आणि निष्णात पायलट ऑटो लिलेन्थाल ह्यानी पक्षांच्या उड्डाणावर सखोल अभ्यास केला व मानवी उड्डाणांतील विविध अडचणी त्यांच्या "प्रॅमोथियस" ह्या ग्रथांत त्यानी १८९५ साली प्रसिध्द केल्या. ग्लायडर हे इंजिन विरहित हवेंत ग्लाईड करणारे पंख असणारे वाहन. लिलेन्थाल ह्यानी अनेकविध ग्लायडर बनविले. त्यांच्या ग्लायडर प्रयोगांत लिलेन्थाल ह्यानी निसर्गामध्यें शेकडो वर्षे उपलब्ध असणारी भौतिक (मटेरियल्स) वापरून पाहिली. १८९१ ते १८९५ ह्या काळांत एकपंखी (मोनोप्लेन) आणि दोन पंखी (बायप्लेन) ग्लायडरच्या दोन हजार फ्लाईट्स केल्या त्यांतील यश आणि अपयश ह्या दोहोंचीहि फोटोग्राफसह टिपणी ठेवलेली सांपडते. तद्नंतर आपले लक्ष "प्रॉब्लेम ऑफ कंट्रोल" कडें वळविले. ग्लायडर वळविण्यासाठी आणि त्याचे "ट्रिम" साधण्यासाठीं ते स्वतःच्या शरीराचे वजन योग्य दिशेला झुकवत. त्यांचे १८९४ मधील मोनोप्लेन ग्लायडर अद्याप अमेरिकेच्या वॉशिग्टन डी.सी. येथील नॅशनल म्युझियम मध्यें पाहता येते. ऑटो लिलेन्थाल ह्यांचा १८९६ च्या एका फ्लाईटमध्यें अपघाती मृत्यु आला.

१८८५ साली अमेरिकेतील सांताक्लारा कॅलिफोर्निया येथील प्राध्यापक जॉन माँटगॉमेरी ह्यानी गरम हवेच्या फुग्याच्या सहायानें "सस्टेण्ड कंट्रोल फ्लाईट" करून मानवालाही उडता येईल ह्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. वायुगति शास्त्रानुसार उत्पादित होणा–या लिफ्ट आणि ड्रॅग ह्या आवश्यक आणि अनावश्यक फोर्सिसची प्रात्यक्षिक माहिती त्यानी प्रसिध्द केली. ग्लायडरमध्यें कमीत कमी वजनाचे स्ट्रक्चरल डिझाइन करून त्यानी "हॅंग ग्लायडर" बनविले त्याच्यामध्यें लटकून धाव घेतली जाते आणि लिफ्ट मिळाल्यास उंच उडता येते. प्रथमतः ह्या सर्व प्रयत्नात जरी इंजिन नव्हते तरी एखादया इंजिनची आवश्यकता जाणवली आणि उगम झाला "मॅन्ड पॉवर्ड फ्लाईट"चा.

विलबर आणि ऑरव्हिल राईट ह्या बंधुचें दुचाकी सायकलीचे दुकान होते. त्यामध्यें अधुनिकता आणण्यासाठी ते "विंडटनेल" टेस्टिंग करत होते. तेथेच त्यानी सयुक्तिक असे इंर्टनल कम्बशन इंजिन आणि दोन ब्लेडचे प्रॉपेलर तयार केले त्यांतून निर्माण झाले त्यांचे "राईट फ्लायर" (आकृति ४) त्यांच्या पंखाचा स्पॅन (बी ) ४० फूट ४ इंच कॉर्ड (सी ) ६फूट ६ इंच वजनः ७५० पौंड

इंजिनः १२ हॉर्सपॉवर १०० आरपीएम (रेव्होल्यूशन पर मिनीट)

२ ब्लेड प्रॉपेलर

हे त्यांचे विमान घेऊन राईट बंधुनी डिसेंबर १७, १९०३ ह्या दिनी अमेरिकेंतील किटी हॉक येथें हवेपेक्षा जास्त वजनाच्या "मॅड पॉवर्ड फ्लाईट" ची ५९ सेकांदाची ८५२ फूट अंतराची फ्लाईटने सत्यता पटवून दिली आणि ते जगविख्यात झाले. ह्या त्यांच्या विमानाची प्रतिकृति अमेरिकेंतील आडल्स हेड ट्रान्स्पोर्टेशन म्युझियममध्यें ठेवलेली आहे .

विमानाचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यासाठी सायंटिफिक अमेरिकन सोसायटीनें बाराहजार पाचशे हे अमेरिकन डॉलरचे बक्षिस जाहिर केले.

स्थळ : हॅमंड स्पोर्ट, न्यूयॉर्क, अमेरिका

दिवस : जुलै ४, १९०८ अमेरिकन स्वातंत्र्यदिन

विमान उपविभाग

(१) डावा पंख (२) उजवा पंख


(३) डाव्या पंखाचे टोक (४) उजव्या पंखाचे टोक

(५) डाव्या पंखाला लावलेले इंजिन (६) उजव्या पंखाला लावलेले इंजिन

(७) उभा स्टॅबीलायझर (८) आडवा स्टॅबीलायझर


(९) नोज गिअर (१०) मेन लँडिंग गिअर

(११) फ्लाईट डेक (१२) फ्यूजलाज




टीप: लांबी फुटामध्ये दाखविली आहे

आकृती २: विमानाच्या उपविभागांची ओळख




आकृती ४ : राईट बंधूंच्या "राईट फ्लायर"ची प्रतिकृती

ह्यासाठीं अगणित लोक,वृत्तपत्रकार,मूव्हिकॅमेरा फोटोग्राफर्स,जमा झाले होते. त्यांच्या समोर ग्लेन कर्टिस ह्यानी स्वतः बनविलेल्या त्यांच्या "जूनबग" ह्या विमानातून जमिनीपासून वीस फूट उंचावर एक मैलापेक्षा थोडे अधिक अंतराचा प्रवास करून हे बक्षिस पटकावले आणि त्यांच्या ह्या विजयाची बातमी संपूर्ण जगभर पसरली. विमानाचे वजन वाढले तर आपले विमान उडूच शकणार नाही ह्याची जाणीव ठेवून ग्लेन कर्टिस ह्यानी त्यांच्या जून बगची रचना केली होती,त्यांच्या विमानाचे वजन होते ६१५ पौंड,पंख्याचा स्पॅन होता ४२.५ फूट,एंजिन होते ४० हॉर्स पॉवरचे.

ग्लेन कर्टिस ह्यांचे शिष्य चार्लस विलियर्ड ह्यानी १९०९ मध्यें विमानातून लाँग आयलंडवर चौदा नॉटिकल मैलांचा चक्री फेरा मारून नविन रेकॉर्ड प्रस्थापित केले.

(पाण्यातील) नॉटिकल मैल =(जमिनीवरील) १.१५ मैल

सध्यां २००९ मध्यें अधुनिक टरबोजेट इंजिन असलेलर विमान लंडनमधून साडेचारशेहे प्रवाशाना त्यांच्या सामानासह घेऊन उंच आकाशांत ऐकेचाळीस हजार फुटापर्यंत जाऊन तेरा तासांचा मनोरंजक प्रवास करून पाच हजार आठशेहे नॉटिकल मैलावर असलेल्या सिंगापौर येथे सुखरूप आणून पोहोचवू शकते.

लेफ्टनंट बेंजामिन फाडलोईस हे अमेरिकन आर्मीचे पहिले पायलट आणि हॅरियट स्विनबी ह्या पहिल्या महिला पायलट. १९१४ मध्यें जगतिक पहिल्या महायुध्दास प्रारंभ झाला. विमानांचा उपयोग शत्रूची पाहणी आणि टेहाळणी (रेकनायसन्स) करण्यासाठीं होऊ लागला शत्रूना हेच काम सुलभतेने करता येऊ नये म्हणून उपयोग होऊ लागला. नंतर विमानांत बॉम्ब ठेवून मोठया प्रमाणात बॉम्बर्स वापरले जाऊ लागले. पहिल्या आणि दुस-या महायुध्दामधील काल हा विमानाच्या दृष्टीनें सुवर्णकाळ ठरतो. पहिल्या महायुध्दातून वाचलेले इंजिनीयर आणि पायलट ह्यानी मुसमुसणारी एव्हिएशन इंडस्ट्री निर्माण केली; अनेकविध खाजगी कंपन्यांची मुहूर्तमेढ झाली. अशातच चार्लस लिंडबर्ग ह्यांची गोष्ट प्रामुख्यान चकाकते.निष्णात पॅराशुटिस्ट म्हणून चार्लस लिंडबर्ग ह्यानी त्यांची कारकिर्द सुरू केली. मग तें आर्मी पायलट झाले आणि नांव कमावले ते एअरमेल पायलट म्हणून! आज एअरमेल पायलट म्हणजे "कोणा झाडाचा पाला वाटेल" परंतु त्या काळांत ते खूपच "रोमँटिक" होते अमेरिकेत १९१८ साली पूर्व किनारा ते पश्चिम किनारा अशी एअरमेल सर्व्हिस सुरू झाली होती.१९३३ साली काँट्रॅक्ट एअरमेल ॲक्ट (केली ॲक्ट) मंजूर होऊन काँम्पिटिटिव्ह बिडिंग सुरू झाले; खाजगी काँट्रॅक्टरना एअरमेलचे काम देण्यात येट्रऊ लागले कांही एअरमेलचे कार्य करून लिंडबर्ग अमेरिकेंतील सँडिआगो शहरातील रायन ह्या विमान कंपनीत रूजु झाले .तिथें त्यानी त्यांच्या "स्पिरीट ऑफ सेंटलुईस" ह्या विमानाला उपयुक्त असे इंजिन बनविले. ह्या इंजिनचा उपयोग करून मे २० आणि २१ ह्या दिनी वाटेंत कोठेहि न थांबता लाँग आयलंड न्युयॉर्क ते पॅरिस सोलो फ्लाईट केली; आणि इंटरनॅशनल हीरो बनले. ह्या विमान प्रवासाठीं त्यानी स्वतः बनविलेली जरूरीपुरती इन्स्ट्रुमेंटस बसविली होती. ह्या माझ्या इन्स्ट्रुमेंट मुळेच अटलांटिक महासागर ओलांडताना मीं अधुन मधुन निर्धास्तपणें डुलकी घेत होतो असे चार्लस लिंडबर्गट्र ह्यानी नमूद केले आहे. ह्याच सुमारास बोईंग कंपनीनें त्याच्या बी-९ ह्या बॉम्बर मध्यें अत्यावश्यक बदल करून दहा प्रवाशासाठीं "ऑल मेटल कन्स्ट्रक्शन" असलेले बोईंग विमान बनविले. ह्या विमानानें १९३३ साली प्रवाशी लोकांच्या विमान वाहतुकीचा "श्रीगणेशा" केला. युनायटेड एअरलाईननें पहिली साठ बोईंग विमानें विकत घेतली होती. प्रवाशांच्या वाहतुकीसाठीं डगलस एअरक्राफ्ट कंपनीनें डीसी १ विमान बनविले,त्यानंतर आले १४ सीटचे डीसी २ आणि २१ सीटचे डीसी ३ ट्रान्स काँन्टिनेन्टल वर्ल्ड एअरलाईन (टी डब्लू ए) १९३६ झाली डीसी ३ विमाने वापरत होते. त्यावेळी जवळ जवळ ८० टक्के डोमेस्टिक शेडयूल सर्व्हिस डीसी ३ विमानेच करत होती.

१९४७ साली जर्मनीला दुस-या महायुध्दातून माघार घ्यावी लागली. दुस-या महायुध्दानंतर "जेट इंजिन" हे सुधारणेचे केंद्रस्थान बनले. जून १९४७ मध्यें लॉकहिड कंपनीनें बनविलेले एल-७४९ कॉन्स्टेलेशन पॅन अमेरिकेन एअरलाईननें घेऊन "अराउण्ड द वर्ल्ड" सर्व्हिस सुरु केली. अमेरिकन ओव्हरसिज एअरलाईननें बोईंगचे दोन मजली ३७७ "स्ट्रॅटोक्रुझर" घेऊन प्रवाशासाठीं इंटरकॉन्टिनेन्टल एअर रूट सुरू केले. डी हॅविलंड ह्या ब्रिटिश कंपनीनें "कामेट" विमानें बनविली. परंतु जानेवारी १९५४ आणि जून १९५४ मध्यें डोन कॉमेट विमानें अपघात होऊन गेली.

१९४७ साली अमेरिकन पायलट चक मीगर ह्यानी रॉकेट इंजिन असलेले एक्स-१ विमान सुपर सॉनिक वेगानें चालवून दाखविले. तद्नंतर लढाऊ कॉम्बट विमाने सुपरसॉनिक जेटच बनू लागली.१९४५ ते १९९० ह्या कालास शीतयुध्द काल (कोल्ड वॉर एरा) असे समजले जाते. अमेरिका आणि रशिया ह्यांचा एकमेकावर अविश्वास होता. ह्या कालांत प्रक्षेपण अस्त्र (मिसाईल) बनविण्याची जणु चढाओढच सुरू झाली.

सरळ पंख असणारे मॉडर्न जेट एफ-१८ ह्याचा उपयोग बॉम्बर,फायटर आणि रेकनायसन्स म्हणून केला गेला अमेरिकन नेव्हि अदयापहि अेअर-शो मध्ये त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.

नौदलाचे ग्रमन एफ पान्थर ह्या अमेरिकन जेट विमानानें १९५० च्या कोरियन युध्दांत रशियामध्यें तयार झालेले वाय ए के ९ विमान हाणून पाडण्याचा अग्रहक्क मिळविला. कोरियन युध्दांत बी२९ सुपर फॉरट्रेस बॉम्बरचा भरपूर उपयोग केला होता. अमेरिकन पायलट एफ ८६ साबर जेट बंदुकीनें शत्रुगटाचे मिग १५ जेट विमान पाडत होते. परंतु अतिवेगी बंदुका अचुकपणे वापरणे किती कठिण असते हे त्यावेळी कळून चुकते आणि प्रक्षेपण अस्त्राची (मिसाईल) निर्मिती सुरू झाली. कोरियन युध्दांत हजारो जखमीना तात्काल इस्पितळांत पोहोचविण्यासाठी हेलिकॉप्टर्स वापरण्यात आली. जर्मन फॉक वुल्फ टी ए १८३ फायटर जेटच्या सापडलेल्या कागदपत्त्यानुसार फायटर जेटच्या पाठीमागे वळलेल्या (स्वेप्ट विंग) डिझाईनला सुरूवात झाली. शत्रुने न्युक्लिअर बॉम्ब वापरला तर मोठया प्रमाणात धुव्वा उडणार आहे तेंव्हा त्याचा प्रतिबंध कसा करावा ह्याचा अटोकाट प्रयत्न ह्या शीतयुध्दांत चालू होता. ह्याचे उदाहरण म्हणजे अमेरिकन एअरफोर्सने त्यांच्या हुकमती खाली असलेल्या स्ट्रॅटेजिक एअर कमांड मधिल अवाढव्य बॉम्बर्स डिलिव्हरीसाठीं सुसज्ज ठेवलें होते. त्यांचे ध्येयवाक्य होते "पीस इज आवर प्रोफेशन" परंतु आम्ही ते मिळविणार पूर्ण सज्ज राहूनच! ह्यांत बोईंच्या पाठीमागे वळलेले पंख असलेल्या आठ इंजिनच्या बी ५२ न्यूक्लिअर बॉम्बरचा प्रामुख्यानें उल्लेख होतो ह्यांत बी ५८ हसलर सुपरसॉनिकचा समावेश होता. सोव्हियत युनियन ,फान्स, ब्रिटन ह्यानीही न्युक्लियर जेट बॉम्बर्सची तयारी केली होती. सुदैवानें न्युक्लिअर बँग घडला नाही... तसे करण वेडेपणाचेच आहे ह्याची कदाचित जाणिव झाली असावी.

शत्रुच्या वस्तूवरून परावर्तित झालेल्या रेडिओ लहरीच्या पृथःकरण योगे त्या वस्तूचा स्थल,वेग,आणि आकार ह्यांचा शोधबोध घेणा-या योजनेला रडर हे शास्त्रीय नांव आहे नविन बॉम्बरना,उदाहरणार्थ बी स्टेल्थ बॉम्बर,विशिष्ठ प्रकारचा आकार दिला जातो.आणि त्यातून स्पेशलाईज्ड रडार सिग्नलच बाहेर सोडले जातात की त्यांमुळें ह्या बॉम्बरचा ठावठिकाण रडार स्टेशनला माहिती होणे अतिशय कठिण जाते. ह्या स्टिल्थचा एक्झॉस्ट थंड करून मगच पसरतो त्यामुळें इन्फारेड इक्विपमेंट त्यांचा शोधच घेऊ शकत नाहीत.

अधुनिक एअर डीफेन्समध्यें अटॅक विमानाना आकाशांत राहणे अशक्य होऊ लागले. अरब एअर डीफेन्समध्यें १९७३ च्या "योम किपुर" युध्दांत इस्त्रायलच्या एअरफोर्सचे खूपच नुकसान केले आणि इंचीवरून उडणा-या बॉम्बर्सचे दिवस जवळ-जवळ संपलेच! लढाईसाठी कमी उंचीवरून जाणारी विमाने तयार करण्यात आली , त्यांच्यावर शोधून हल्ला करण्यास एअरफोर्सला वेळ अपुरा पडू लागला शिवाय हे बॉम्बर फ्लेअर्स,रडार वॉर्निंग रिसिव्हर आणि जॅमरनें सज्ज होते. हॅरिअर फायटर बॉम्बर हे व्हर्टिकल टेक ऑफ आणि लॅण्डिंगच विमान असल्यामुळें जंगलात लपून चुटकीत हल्ला करून पुनः लपत असे किंवा परत फिरत असे.

मॅगडॉनल डग्लसचे सी १७ हे ट्रॅन्स्पोर्टर विमान विख्यात आहे. त्यानें २००१ मधील अफगाणिस्थान कारवाईत लाखाच्यावर जीवनउपयोगी पॅकेजिस एअरड्रॅाप केली. जी फायटर विमाने बाहेर निघून शत्रुपक्षाची विमाने शोधून त्याना थोपवून धरतात अशाना इंटरसेप्टर म्हणतात.१९५४ साली एफ १०४ स्टारफायटर बनविले. त्याचे फ्युजलाज टोकदार सुईसारखे आणि त्याला होते रेझर शार्प छोटे पंख. ते ध्वनीच्या दुप्पट वेगाने उडाले.

डिसेंबर १७ , १९०३ मध्यें राईट बंधूना हवेतून ८५२ फूट अंतर जाण्यासाठी ५९ सेंकद म्हणजे जेमतेम ताशी दहा मैल वेग आणि आंता अक्षरशः कित्येक हजारो मैलांच्या वेगानें मानवानें तयार केलेले "आकाशयान" प्रक्षेपित केले जाते आहे.

मानवानें पक्षासारखी हवेत भरारी मारण्याचे त्याचे "स्वप्नसाकार" केलेच आणि त्याच्या जोडीला विमानशास्त्र कार्यक्षेत्र बहुत विस्तृत केले; आणि हे सगळे जेमतेम एका शतकातच ही प्रगति वाखाणण्याजोगी आहे.

अधुनिक विमानशास्त्राचे प्रमुख्यानें एरॅानॉटिक्स,ट्रान्स अॅटमॉसफेरिक आणि अॅस्ट्रोनॉटिक्स असे तीन उपविभाग पडतात. एरॅानॉटिक्समध्यें आहेत एअर ट्रान्स्पोर्टेशनसाठी वापरली जाणारी प्रवासी विमाने,बिझनेस जेट,बॉम्बर्स,फायटर्स,लॉजिस्टिक्स,रिकनायन्स युध्दोपयोगी विमाने,स्पोर्ट आणि प्रायोगिक विमानांचाही ह्यात अंतर्भाव आहे. हवेपेक्षा हलकेफुगे बलून्स ह्यांचाही समावेश होतो. ट्रान्स अटमॉसफेरिक हा झाला विशेषत्वेकरून स्पेस ट्रान्स्पोर्टेशनचा विषय ह्यांत येतात लॉंच करण्याची वाहने,स्पेस शटल,व्हेंच्युअर स्टार,बॅलिस्टिक मिसाईल,हायपरसॉनिक क्रूज व्हेइकल्स.

अॅस्ट्रोनॉटिक्समध्यें येतात स्पेस प्रोब, अर्थ सॅटेलाईट,फ्लायबाय सोलर ऑरबिटर्स,ल्यनार आणि प्लॅनेटरी ऑरबिटर्स,ल्युनार आणि प्लॅनेटरी लॅंडर्स. आतां मानव तयारी करतो आहे अंतराळांत जाऊन वसाहत करण्याची .

-बाळ ठाणेदार




चालिसेक वर्षे उलटून गेली. ६५ सालच्या एप्रिलमध्ये रिझल्टनंतर अकरावीचे-त्यावेळच्या 'एसेस्सी'चे वेध लागलेले. इंग्लिश व गणित तर कायमचे शत्रू. त्यामुळे 'क्लास' आवश्यकच होता. कुठला, तेदेखील तसं ठरलेलंच. दादरच्या हिंदूकॉलनीतल्या पाचव्या गल्लीतील चाफेकरांचा क्लास.

दुमजली इमारतीतील तळमजल्यावरचं उजवीकडचं घर चाफेकरांचं. ॲडमिशनसाठी गेल्यावर समोर आले-उंच, गोरेपान, हसतमुख चाफेकर. बॅरिस्टर अच्युत कृष्णाजी चाफेकर.

'हं बोला.'

'क्लासला यायचयं इंग्लिश-मॅथ्ससाठी'

'शाळा कुठची?'

'किंग जॉर्ज.'

'वाटलंच. पूर्ण महिनाभर बेसिक इंग्रजी शिकायचं.'

'बेसिक?'

'हो. बेसिकच.पाटी आधी स्वच्छ केली पाहिजे. ए,बी,सी,डी तरी येत असेल ना?' चेह-यावर मिस्किल हास्य.

'अं, हो.'

'खूप झालं. इथं महिनाभर आम्ही-म्हणजे माझे वडील बापू आणि मी 'तर्खडकर' घोटून घेतो. एसेस्सीची मारामारी नंतर तुमच्या-माझ्यात.'

'फी किती? '

'दोन्ही विषयांचे दहा रुपये. सकाळच्या बॅचला येणार?'

'होय. पण शाळा सुरु झाल्यावर संध्याकाळी.

'ठीक आहे. या मग १ मे पासून.'

मी निघालो.

पण हा क्लास आणि बेंचेस कुठायत? दहा बाय बारा-तेराच्या खोलीला मध्यभागी दरवाजा. उजवीकडे खिडकी. डावी-उजवीकडे बसण्यासाठी बाकं. लिहिण्यासाठी अरुंद टेबलं..एकाला एक लागून. खाणावळ टाइप. सरांसाठी टेबल-खूर्ची तर सोडाच, भिंतीवर फळादेखील नाही. उजवीकडे मुलांची रांग, डावीकडे मुलींची. एवढयाशा खोलीत मावतील एवढीच मुलं. कमी नाही, जास्त नाही. क्लास तर सुरु झाला. दाराच्या चौकटीत उभं राहून सत्तरीच्या आसपासचे बापू 'तर्खडकर' शिकवू लागले. धोतर-सदरा, गोल फ्रेमचा चष्मा, अन खणखणीत नाण्यासारखा आवाज.

'लाल दांडयापासून अर्धा इंच सोडून लिहा. प्रेझेंट टेंन्स, आल कॅपिटल्स -सगळी लंबू मंडळी-पी..आर..ई..एन..टी.. ' (लाल दांडा म्हणजे समास)

'पुढची ओळ दांडयाला चिकटून...' मग आय, वुई, यू, यू, ही, शी, इट.. वगैरे मंडळीना बरोबर घेऊन सर्व काळांतून फेरफटका मारता मारता इंग्रजीचं भूत केव्हाच मानेवरुन उतरलं.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या ओळी-ओळीतील शब्दसंख्या, वह्या सारख्या.(पुढे पुलंचे 'चितळे मास्तर' वाचताना हे बापू आठवले)

शाळा सुरु झाल्यावर संध्याकाळचा क्लास. इंग्लिशसाठी बोर्डाचे सिलेक्शन आणि कर्दनकाळ गणित. शिकवणार अच्युतसर. बॅरिस्टर अच्युत कृष्णाजी चाफेकर. दिवसभर कोर्ट करुन संध्याकाळी दादर स्टेशनवरुन ते चालत घरी यायचे. कधी त्यांना उशीर व्हायचा तेव्हा मुलामुलींच्या फिरक्या.. कधी सरांच्या नुकत्याच झालेल्या मुलाला खेळवणं वगैरे चालायचं. सर आले की सारे वर्गात बसेपर्यंत पाचच मिनिटांत फ्रेश होऊन ते दरवाजात हजर. मग कुणालाही विचारणार, 'अहो पेंगट, कुठं होतो आपण परवा?' विद्यार्थी वा विद्यार्थीनी असो, कुणालाही अरे-जारे, अगं-तुगं नाही. सगळेच आदरार्थी 'अहो'. इतकं, की 'पेंगट' ही हाकदेखील सन्मानच वाटावा. खेळीमेळीत, हास्यविनोदात क्लास सुरु व्हायचा. बिनफळयाचा क्लास.

इंग्लिश एक वेळ ठीक, पण बीजगणित, अंकगणितच नव्हे तर भूमितीदेखील फळयाशिवायढ भूतांची ही त्रिमूर्तीदेखील मानेवरुन केव्हा उतरली ते कळलंच नाही.


इंग्लिशमधील स्पेलिंग्ज, उच्चार कसे करावेत? "इमिजिएटली" असा उच्चार इतरांनी करायचा. आपण कसा करायचा? इमिजटली - जसं 'यमी नटली'.

'टॉवेल' इतरांसाठी, आपण काय म्हणायचं? 'टावल'. भलतंच स्टायलीश.

असं खेळीमिळीत शिकताना फळयाचं नसणं कधीच जाणवलं नाही. क्लासची जाहिरातबाजी तर सोडाच, घराबाहेर पाटीदेखील नाही. कधी फी चा तगादा नाही, की पैशांसाठी अट्टाहास नाही. केवळ

शिकवण्याची आवड. इतकंच नव्हे तर 'सामान्य' विद्यार्थ्याला जाणवणारा गणिताचा बागुलबूवा दूर करण्यासाठी, त्यांना चांगलं, शुद्ध इंग्रजी शिकवण्यासाठी होता तो दुर्दम्य अट्टाहास. त्यामुळे एरवी गटांगळया खाणारेदेखील 'क्लास' मध्ये एसएससी पास होत.
परिक्षा झाल्या, रिझल्ट लागले.
पेढे द्यायला जाताना वाटलं, काय द्यावं सरांना आठवण म्हणून?
चित्रकला अंगात होती. सुट्टीत बरंचसं स्केचिंग, पोर्टेट्रस केलं होतं. लता, गदिमा, बापू नाडकर्णी वगैरे. नुकत्याच पाकिस्तानशी झालेल्या युद्धातल्या विजयामुळे आमचे हीरो होते-लालबहादुर शास्त्री. त्यात त्यांचं दुर्दैवी निधन झालेलं. त्यांचं केलेलं पेन्सिल पोर्टेट्र गुंडाळी करुन घेऊन गेलो.
'कुणी केलं हे? तुम्ही?'
'होय.'
'गुड. व्हेरी गुड. एक गोष्ट लक्षात ठेवा. शिक्षण झाल्यावर नोकरीधंदा सगळेच करतात. जगण्यासाठी करावेच लागतं. पण जगायचं कसं, हे आपल्याच हातात असतं. तेव्हा हे छंद, ही कला उपयोगी पडते. तेवढं नेहमी सांभाळायचं. समजलं?'
'समजलं तर खरंच. पण सरांची 'बॅरिस्टरी' आणि इंग्रजी-गणित शिकवण्याचं घेतलेलं व्रत-हे कोडंदेखील सुटलं.
ssssss
काळ निरंतर सरकतच असतो.
सर नंतर शिवाजीपार्कजवळ कुठेतरी राहू लागले. त्यांच्या मुद्दामहून भेटी कधी झाल्या नाहीत. त्या अचानकच व्हायच्या. कधी दादर स्टेशनबाहेर, कधी मुंबई-पुणे प्रवासात. गप्पा व्हायच्या. त्यांच्या, बापूंच्या 'इंग्रजी' विषयाच्या पुस्तकाची कधी आवृत्ती निघाल्याचं कळायचं. चारेक वर्षांपूर्वी टी.व्ही.वर त्यांचा एक मुलाखतवजा कार्यक्रम असल्याचं त्यांनी आवर्जून कळवलं होतं. विषय-अर्थातच इंग्रजी सोप्या पद्धतीने शिकवण्याचा. कधी पोस्टाने इंग्रजीसंदर्भात काही सुचलेलं, वाचलेलं सायक्लोस्टाइल-झेरॉक्स ते पाठवीत असत.
हिंदूकॉलनीतील त्यांचं घर ब-याचदा बंद असायचं. कधी खिडकी उघडी दिसली तरीही मुद्दाम कधी गेलो नाही. परवा मात्र दरवाजादेखील उघडा दिसला. अर्थात बाहेरचा जाळीचा दरवाजा बंद होता. का कुणास ठाऊक, पायदेखील तिकडे वळले. पाय-या चढून बेल वाजविली. आतनं एक तरुणी आली ंविवाहीत.
'कोण पाहिजे?'
'अं चाफेकर, चाफेकर सर आहेत?'
'आपण?' तिचा चेहरा गोंधळलेला.
'मी त्यांचा विद्यार्थी ४० वर्षांपूर्वीचा.'
काही क्षण निःस्तब्ध.
'या ना, आत यां' असं म्हणत ग्रिलचा दरवाजा उघडला. उजवीकडची तीच खोली. तशी जुनीच. फक्त बाकांच्याऐवजी घरगुती दिवाण, खुर्च्या, कोप-यात टी.व्ही., तो पाहणारी दोन पिल्लं. त्यातल्या धाकटीला भरवण्याचा आईचा प्रयत्न चालू असावा.
'गेल्या वर्षीच गेले बाबा.'
'काय? क्य सांगताय? काय झालं अचानक?'
'ब्रेन हॅमरेज. वीसेक वर्षांपूर्वी असाच त्रास झाला होता, तेव्हा एका डोळयाची दृष्टी गेली होती. आता तेच गेले'. तिच्या चेह-यावर निग्रह.ठेवण तशीच वडिलांसारखी. मी सुन्न झालो. काय बोलावं सुचेना.
'तुम्हाला मोठा भाऊ आहे ना?'
'हो. तो शिवाजीपार्कच्या जागेत असतो. आई-बाबा तिकडेच असायचे.'
'आई म्हणजे माधवी चाफेकर ना? रुईयात शिकवायच्या.'
'हो. ती देखील गेली फेब्रुवारीत-कॅन्सरने.'
आता मात्र तिने मान वळविली डोळे दगा देतील म्हणून.
'सॉरी. मला काहीच कल्पना नव्हती. एव्हढयात सरांशी काही कॉटॅक्ट नव्हता. उगाचच तुम्हालां'
'नाही, तसं काही नाही. दोघंही एकामागोमाग गेले. सावरणंही कठीण झालं.'
'मी देखील आज सहज घर उघडं दिसलं म्हणून आलो. एरवी ब-याचदा बंद असायचं.'
'आता आम्ही इथं राहतो. मीदेखील बाबांसारखीच 'लॉ'ची प्रॅक्टीस करते.'
'आणि शिकवणं?'
'बाबांसारखं? अशक्य.'
तिचा आवाज पुन्हा कातरला.
'निघतो मी. आता सर फक्त आठवणींत.'
'खरं आहे तुमचं.'
निरोप घेऊन निघालो.
चाळीस वर्षांपूर्वी याच घराच्या बिनफळयाच्या क्लासच्या चारच पाय-या उतरताना मनात उतरलेलं एक वाक्य आठवलं, 'जगायचं कसं, हे आपल्याच हातात असतं. तेवढं फक्त सांभाळायचं.'

**-प्रभाकर बोकिल**



# पाहुणचार

दिवाळी आली की हटकून मला ३-४ वर्षापूर्वीच्या माझ्या पहिल्या दिवाळसणाची आठवण होते. लग्नानंतरची पहिली दिवाळी सासुरवाडीला झाली. सगळेच नवीन - संबंध, माणसे, स्वभाव! अन त्यात आमचा स्वभाव भिडस्त! म्हणून तर ती दिवाळी चांगलीच लक्षात राहिली.

दसरा संपवून ८-१० दिवस झाले की, सासरेबुवा येऊन वत्सलेला माहेरी घेऊन गेले. मलाही आग्रहाचे निमंत्रण होतच. पहिल्या आंघोळीच्या दिवशी सकाळी मी तिथे गेलो. सासुरवाडी अगदीच खेड्यात होती. एस. टी. स्टँडवर उतरून पुढे वस्तीवर जावे लागे. स्टँडवर दोन्ही मेहुणे, सासरे व इतर दोघे तिघे जण होते. मी बॅग घेऊन चालायला लागलो. तोवर गडी पळत येऊन म्हणाला, "चला दाजी. रस्त्याच्या कडला गाडी हुभी केलीया!" मला बैलगाडीची सवय नसल्याने मी म्हणालो, "बैलगाडी कशाला? चालतच जाऊ की वस्तीवर." पण एवढ्यात सासरेबुवा म्हणाले, "नगं नगं आवं तुमच्यासाठीच तर गाडी जुपलीय अन चालत कशापाय?" मग दोन्ही लहान मेहुणे व मी गाडीत बसलो, इतर सारे आमच्या मागे गप्पा मारीत निघाले.

बैलं पळायला लागली तसे माझ्या शरीराला जोरजोरात हिसके बसायला लागले. एकदा डोकं दांड्यावर आपटलं तर एकदा मीच जोरात उठून परत गाडीत आदळलो. म्हटलं आता घरी जाईपर्यंत आपलं काही खरं नाही. माझे दोन्ही मेहुणे मात्र गाडीच्या दांड्यावर बसून मजा लुटत होते. मला नेमकं कसं बसावं हेच समजेना अन बहुतेक माझी ही अडचण सासऱ्यांच्या लक्षात आली असावी. ते म्हणाले, "आरं हणम्या, गाडी जरा दमानं हाक की लेका, शेरातल्या मानसास्नी सवं नस्ती गाडीचीऽऽऽ". पण इकडं हणमंतराव गाणं म्हणत आपल्याच नादात गाडी हाकीत होते. त्यामुळे आमचे हाल चालूच होते.

खरं तर खेड्यातलं शुद्ध वातावरण, सकाळचा पक्ष्यांचा किलबिलाट, हिरवीगार वनराई या साऱ्यांनी एरव्ही मन कसं प्रसन्न झालं असतं. पण इथं या गाडीच्या हिसक्यांनी अंग नुसतं बुकलून निघत होतं. एवढ्यात गाडी वस्तीसमोर थांबली. मी टणकन उडी मारली नि सुटकेचा श्वास सोडला. सासूबाईंनी भाकरीचा तुकडा ओवाळून स्वागत केले. दाराच्या आडून वाकून वत्सला मोठ्या कुतूहलाने व हसत माझ्याकडे पाहत होती. पुन्हा तशाप्रकारचं कुतुहुलमिश्रीत हसणं, निरागस भाव कधीच दिसले नाहीत. कदाचित सर्वांचा हाच अनुभव असावा... असो.

हात-पाय धुऊन झाल्यावर चहा-फराळ आला. सासरे म्हणाले, "घ्या, फराळ घ्या दाजी"

फराळाला सुरुवात केली. चावून चावून कानशील दुखून आली तर तिखटानं नाकाला धार लागली. त्यात पून: पुनः आग्रह! कानशिलावरून हात फिरवीत मी नको नको म्हणत होतो. एवढ्यात हणम्या तेलाची बाटली घेऊन आला व म्हणाला, "चला दाजी, अंग चोळतो. " हणम्या आपल्या सर्व ताकदीनिशी अंग चोळायला लागला. त्याच्या हिसक्यांनी मी कळवळून म्हणालो, "अरं हणमंता, जरा सावकाश रेऽऽ"

"थांबा उईसं दाजीऽ, परवासानं शिणला असचाल नव्हं? अंग मोकळंच करतो." तो नेमका माझं अंग मोकळं करीत होता की त्याच्या स्वतःच्या ताकदीचा अनुभव घेत होता हेच मला समजेना.

"पुरे पुरे, हणमंता! " असं म्हणत उठून उभा राहिलो. "बरं बरं, आता उटणं लावून आंगुळच घालतू म्हंजी कामच संपील" असं म्हणत त्यांनी मुलांना हाक मारली, "या रंऽ पोरावानोऽ", अन आंघोळीला सुरुवात केली. घंगाळीतून मोठ्या तांब्यांनी पाणी अंगावर ओतलं नि मी थोडाफार ओरडतच उठून उभा राहिलो.

"अरे, अरे, पाणी फारच कडक आहे कीऽ". पण माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत हणमंतानं मला दाबून खाली बसवत सपाटा लावला. मुलेही उटण्यानं अंग खसाखसा घासायला लागली. मग मात्र मला सोसवेना. मी तडक उठलो नि ओलेत्यानेच ओसरीवर येत अभ्यंगस्नानाची सांगता केली.

खरं तर दिवाळीचा सुमार म्हणजे थंडीची सुरुवात. पण असल्या थंडीत देखील दुपाऽऽऽरपर्यंत अंगाची व पाठीची आग आग होत होती. वैतागून मी वत्सलेला म्हणालो, "अगं काय हे घासणं? पाठ सकाळी सोलून निघाली असेल."

"तेल लावू का थोडंसं? मऊ पडेल. " ही हलक्या आवाजात म्हणाली. "छट, पाठीला हात लावायचं नाव काढू नकोस. आधीच सकाळी बैलगाडीत अंग तिंबून निघालंय यात आणखी ही भर!" वत्सलेला हे सारं पसंत नसावं. पण तशी ती अगदीच मऊ होती. कोणाला काही बोलली नाही. त्यांच्या सर्व कुटुंबात बारावीपर्यंत शिक्षण घेतलेली फक्त वत्सलाच. रोज तालुक्याच्या गावी जाऊन शिकली म्हणून तर सासऱ्यानं शहरातला जावई शोधला म्हणे.

दुपारच्या जेवणाला उशीरच झाला. गावातले चार-दोन लोक पंक्तीला होतेच. जेवण एकदम चमचमीत! अन आग्रह तर विचारता सोय नाही. दुपारी मस्तपैकी ताणून दिली. दुपारचा चहा शेजारी अप्पांकडे झाला. अप्पांकडचा चहा फराळ म्हणजे सकाळच्या दात अन कानशील दुखीत दुपटीनं भर पडली. तिथून सासऱ्यांच्या शेतातून चक्कर मारली. बागायत शेती सगळी, फारच आल्हाददायक! पुढे लांबवर धुरांचे लोट, काही काही नव्हतं. सगळं कसं शुद्ध अन शांत शांत वाटत होतं. निसर्गातल्या आगळ्या वेगळ्या सानिध्यात मन कसं प्रसन्न झालं होतं. फिरून सारे वस्तीवर परतलो. सासूबाई पणत्या लावीत होत्या. दृश्य खरंच लोभसवाणं होतं. सगळ्या वस्तीवरच्या मुलांना घेऊन फटाके उडविले. मजा आली.

नको नको म्हणत पुन्हा रात्रीचे जेवण भरपूर झालंच. घरी अगदीच ठरावीक वेळी खायची सवय असल्याने रात्रभर अस्वस्थच होतो. पहाटे लवकर जाग आली म्हणून बाहेर आलो तर हणमंता अन मुलं आंघोळीच्या तयारीत असलेली दिसली. बाप रेऽ म्हणत पटकन पुन्हा खोलीत शिरलो व वत्सलेला ठामपणे सांगितले की आज परत कालाच्यासारखी आंघोळ घालाल तर मी तसाच गावी जाईन. मग हिच्या सांगण्यावरून आंघोळीचं संकट टळलं होतं, पण रात्रीपासूनची पोटदुखी चालूच होती. मी हिला सहजच म्हणालो, "अगं, रात्रीपासून पोट दुखतंय गं!"

झाऽऽलंऽ - बघता बघता ही बातमी साऱ्यांना समजली. लगेच अप्पा, आबा, मामा, पाटील सारेच गोळा झाले. या साऱ्या लोकांच्या एकोप्याचं मला भारी कौतुक वाटलं अन लगेचच आमच्या चाळीतले दिवस आठवले. तिथही असच, जऽरा कुठं खुट्ट वाजलं की सारी चाळ गोळा व्हायची. मग सार्वजनिक विचार-विनिमय, सल्ला वगैरे वगैरे. पण हल्लीच्या फ्लॅटमध्ये पोट दुखू द्या नाहीतर कोणाचा जीव जाऊ द्या कुणाला त्याचं सोयर सुतक नसतं. साधं फिरकायला सुद्धा कोणाला सवड नसते. फ्लॅट सिस्टम मधली ही आधुनिक 'फ्लॅट' संस्कृती असावी कदाचित.

अप्पांच्या आवाजाने मी भानावर आलो. अप्पा पुढे सरसावत म्हणाले, "पोटदुखीवर लै जालीम औषध हाय माझ्यापाशी. हे बघा दाजीस्नी भरपूर जेवायला घालायचं अन पाण्यातून सोनामुखी घ्यायची. पोट नाही थांबलं तर इच्चारा मला. आवं काट्यांनी काटा काडायचा."

मग प्रत्येकजण आपापला औषधी बटवा मोकळा करू लागला. कुणी काय तर कुणी काय. आळीपाळीनं त्यातल्या दोन-तीन जिनसा माझ्या पोटात गेल्या अन आगीतून फोफाट्यात गेल्यासारखं झालं. दिवसभर हेलपाट्यानं बेजार झालो. माझ्यासोबत येणारा श्रीपतीसुद्धा हैराण झाला. शेवटी वत्सलेला विचारून परस्पर मी व श्रीपतीनी डॉक्टर गाठला व औषध घेऊन आलो. पण दुर्दैव माझं की घरी येईपर्यंत मंडळी वस्तीवर हजर होतीच. बहुदा आमची बातमी येण्यापूर्वीच पोचली असावी. कारण आम्हाला पाहताच अप्पा म्हणाले, "दाजी तिकडं कशाला गेला बरं? आवं डाकदर कसला, हजाम लेकाचा त्योऽ. आमी दिलं नसतं व्हय औषध? " हे ऐकून मनात म्हटलं - कशाचं औषध अन काय? ऐन दिवाळीत पोटाचं दिवाळं निघालं. पण सावरीत म्हणालो, "तसं नव्हे अप्पा, जरा जास्तच त्रास व्हायला लागला म्हणून गेलो."

औषधाने बराच गुण आला. झोपही छान लागली. सकाळी उत्साह वाटत होता. रात्रीच्या गाडीनं परत गावी निघायचं होतं. सगळी तयारी करून ठेव असं वत्सलेला सांगितले. एवढ्यात पाटील आले व म्हणाले, "हं काय म्हनतीया जावईबापूंची तब्येत?"

"बरीय आता" मी म्हणालो.

"बगा बरं, आमच्या अप्पाचं औषध हायच तसलं."

मी गप्प बसलो. म्हटलं खुलासा करून परत नवीन संकट नको.

"आज आमच्यात जेवाया यायचं बरं का"

"नको, नको" मी घाईघाईनं म्हटलं, "अहो आत्ताच तर बरं वाटतंय त्यात आज गावाला पण जायचंय".

"मग त्येला काय होतंय? अवंऽ जान-जवान मर्द तुमी, अन असं भ्याया काय झालंय? काय व्हत नाही. वैनी, आज वच्छीला अन जावई बापूला पाठवा बरं जेवाया. त्यांच्यासाठी आज खास कोंबडं कापलया."

आता मात्र कहर झाला होता पाहुणचाराचा!

पण या साऱ्यांच्या आतिथ्याचं, पाहुणचाराचं मला भारी नवल वाटत होतं. प्रत्येकांच्या वागण्यात अगत्य, आग्रह, आपुलकी! कोणाला घरचा, शेजारचा वगैरे फरकच जाणवत नव्हता. सगळं कसं एकदिलानं चाललं होतं. त्यात थोडासा अतिरेकी पणा होता हे खरंय, पण ते सारं शुद्ध मायेपोटीच नव्हतं का? आपल्याकडे कुणीतरी यावं, पोटभर खावं! हीच भावना.

खरं तर ही भावना सुद्धा हल्ली कमी होत चालली आहे. भावनाच कमी होतेय तर मग स्वतः कष्ट करून जेवू-खाऊ घालणं तर लांबच. उलट एखाद्याकडे गेलो व दुर्दैवाने तिथे जर टी. व्ही. वर एखादी मालिका अथवा मॅच चालू असेल तर, भेटायला गेलेल्या माणसाचं सुद्धा "कशाला नसती ब्याद आली?" अशा चेहऱ्याने स्वागत होते. त्यामुळे असल्या पाहुणचाराचं माझ्यासारख्या शहरी माणसाला जरा जास्तच अप्रूप वाटलं आणि ही सारी जमेची बाजू गृहीत धरून मी पाटलांच्या जेवणाला शेवटी होकार दिला. नेहमीसारखाच त्यांच्या आग्रहाला व कोंबडीच्या रस्स्याच्या मोहाला बळी पडून भरपेट जेवलो. पोट अगदी तडीस लागलं होतं. इथंही आमचा भिडस्त स्वभाव नडलाच.

निघायची वेळ झाली. सारी मंडळी एकत्र जमली. हुरड्याला, गुऱ्हाळाला यायचं आमंत्रण स्वीकारून साऱ्यांचा निरोप घेतला. एस. टी. मार्गाला लागली. वत्सला माझ्या खांद्यावर डोकं ठेवीन निर्धास्तपणे झोपली होती. गाडीच्या हिसक्यांनी पुन्हा माझ्या पोटात गडगडल्यासारखं वाटत होतं. त्यामुळं मी मात्र धास्तावून परमेश्वराचा धावा करत होतो, "देवा रे, घर गाठेपर्यंत आतून कोंबड्यानं बांग दिली नाही म्हणजे जिंकली रेऽ बाबाऽऽऽ"

===========

---- सौ. माधुरी शहा, सोलापूर.

===========

# सायंकाळी कातरवेळी



असाच एक नेहमीचा दिवस. सवयी प्रमाणे मी माझ्या दिवसाच्या अपॉइंटमेंटची प्रत छापली व यावर नजर टाकली. लीस्ट मध्ये आज चार तरी पेशंट सत्तरी ते ऐंशी वयाचे होते. एकजण तरी ८९ वर्षांचा होता. त्याचे नाव मला नवीन वाटले. त्याला मी आज प्रथमच पहाणार होते. बाकीचे तीन सीनियररर्स माझ्या माहितीतले होते. त्याची हिस्टरी मला माहीत होती. हया सर्व पेशन्टच्या फाईलस् मी चाळल्या व दिवसाच्या तयारीला लागले. मला आर्मी हॉस्पिटलमध्ये कामाला लागून जवळ जवळ २९ वर्ष झाली आहेत. माझे हॉस्पिटल हे मला दुसरे घरच वाटते. माझे पेशंट म्हणजे आर्मी एअरफोर्स नेव्ही रीटायरीज. मी या लोकांना व यांच्या कुटुंबियांना वर्षानुवर्षे ओळखत आहे. आज हया लोकांना मी पाहीले की ८० साली मी जेव्हा प्रथम कामाला सुरवात केली त्याची आठवण होते. आजचे हे सीनियर लोक किती तरूण होते. त्यांच्याकडे पाहीले की मी पण त्यांच्यावरोबर वयाने व अनुभवाने किती वाढले याची जाणीव होते.

बरेचसे पेशन्टस् मला तीन ते चार महीन्यांनी येऊन भेटतात. वर्षानुवर्षे त्यांचा इलाज करता करता मी त्यांच्या सर्व सुखदुःखाची नकळत भागिदार झाले आहे. कुणाला किती मुले आहेत. ती काय करतात. रीटायर आयुष्य हे कसे घालवतात याची मला पूर्ण माहिती आहे. उदाहरण म्हणजे "मेस्की" दाम्पत्य. दोघेही सत्तरीच्या पुढचे. दोघांनाही खूप मेडीकल प्रॅाब्लेम्स आहेत. त्यांचे आधी घर होते. घराचे काम झेपेना म्हणून आता छोट्या condo मध्ये रहातात. दोघांनाही चालताना walker लागतो. त्यांना ५ मुले आहेत. त्यांना सांभाळणारे मात्रा कोणी नाही. मुलांची सुना नातवंडाची भेट होते ती फक्त ख्रिस्टमसला किंवा थॅक्स गिव्हींगला. एरवी हे दोघेच एकमेकांचे आधार आहेत. दोघांची अपॉइंटमेंट सुद्धा एकाच वेळी असते. मि. मेस्कींना जास्त प्रॅाब्लेम्स असल्यामुळे मेरी गाडी चालवते. तिलाही खूप मेडीकल प्रॅाब्लेम्स आहेत पण त्यांना नेणारे आणणारे कोणी नसल्यामुळे "चलती का नाम गाडी"त्यांनी चालू ठेवली आहे. हया दोघांना एकत्रा एकमेकांची काळजी घेताना पाहीले की खूप कौतुक वाटते.

मात्रा हयांच्या पैकी एकालाही काही झाले तर दुस-याची काय परिस्तिथी होईल याची कल्पना करवत नाही. दुसरे उदाहरण आहे माझ्या ८२ वर्षाच्या पेशन्टचे. तिचा नवरा जवळ जवळ १५ वर्षापूर्वी गेला. तेव्हापासून ही बाई एकटीच आपल्या घरात राहते. स्वतः नोकरी करत असे व दहा वर्षापूर्वी रिटायर झाली. गेल्या दोन वर्षात रेनी मध्ये एकदम बदल झाला आहे. तिची स्मरणशक्ती खूप कमी झाली असून ती खूपश्या गोष्टी विसरू लागली आहे. ही गोष्ट दोन वर्षापूर्वी माझ्या लक्षात आली. मी तिला बरेचदा गाडी न चालवण्याबद्दल सांगितले. आपली स्मरणशक्ती कमी आहे अथवा मेमरी लॉस आहे हे मान्य करणे बरयाच लोकांना कठिण जाते. बरेचसे लोक denial मध्ये राहतात व काही वेळा तर ही गोष्ट काढली की रागवतात. हयाचे कारण एकच हया लोकांना कोणाचा आधार नसतो. घरची grocery आणणे. वील भरणे वगैरे अनेक जबाबदारया ही लोकं वर्षानुवर्षे करत आलेली असतात. तेव्हा मेमरी लॉसची चर्चा म्हणजे एक फारच sensitive विषय होतो. हया मेमरी लॉस मुळे ही पेशंट औषधेही वेळेवर घेत नसे. एकदा verdose म्हणजे जास्त औषधे घेऊन मरता मरता वाचली होती. ही गोष्ट पाहिली की असे पेशंट्स किती निराधार असतात हे जाणवते.

ब-याच अशा सीनिअर पेशंट्सशी मी बोलताना त्यांची कोणी family जवळ आहे का याची चौकशी करते. बहुतेकांची मुले मोठी असून दूरच असतात व आपापल्या संसारात रमलेली असतात. जेव्हा जेव्हा हे पेशंट्स माझ्याकडे येतात तेव्हा त्याचा भावनांचा बांध फुटतो. त्यांना कोणीतरी ऐकणारे आहे यातच त्यांचे समाधान

असते. त्यांच्या सुखदुःखात मला ही लोक सामावून घेतात. चार गोड शब्द ऐकायला त्यांचे मन भुकेलेले असते.

प्रत्येक सीनियर पेशंटला माझा पहिला प्रश्न असतो “how did you get here today?” त्यांनी drive केले आहे की कुणी त्यांना आणले याचा मला अंदाज घ्यायचा असतो. अनेकांचे उत्तर असते “Don’t worry, I took inside road”. Inside Road असला तरी ड्राईव्हिंग हया पेशंटना योग्य नाही हे मला माहित असते. ज्या व्यक्तीला मेमरी लॉस आहे तिने ड्राईव्ह करावे ही एक धोकादायक गोष्ट असते. मी परत पेशंटला सेफ्टीबद्दल लेक्चर देते. हया लोकांना काहीच आधार नसल्यामुळे विकट परिस्थिती असते.

अशा ब-याच लोकांना मी Assisted living चा पर्याय सुचवते. त्यांनी आपल्या सेफ्टीचा विचार करावा. हे सांगत असताना मला आपल्या जीवनात येणा-या अशा वळणाचा विचार येतो. यापैकी ब-याच लोकांना “Assisted living” चा विचार करणे शक्य नसते कारण त्यासाठी पैसाही खूप लागतो. हा न सुटणारा प्रश्न आहे व ही समस्या आणखी विकट होत जाणार आहे. याची जाणीव आणखी दृढ होत आहे.

आजच एक रीटायर्ड. ८९ वयाचे कर्नल माझ्याकडे पेशंट म्हणून आले. वयाच्या मानाने त्यांची तब्येत चांगली दिसत होती. मी त्यांना प्रथमच भेटत होते. हाय हेलो व introduction झाल्यावर मी त्यांची माहिती विचारू लागले. त्यांनी शोधून शोधून एक कागद काढला. हा कागद शोधायला त्यांना दहा मिनिटे लागली. हया कागदावर त्यांनी माझ्याबरोबर काय काय discuss करायचे ते लिहीले होते. त्यांच्या हया वागण्यावरून त्याला मेमरी लॉस आहे हे स्पष्ट दिसत होते . रीटायर्ड कर्नलचा रूबाब मात्र टिकवून होते. बोलता बोलता ते शब्द शोधत होते. ते एकटेच राहत होते. बायकोचा काही वर्षापूर्वी मृत्यू झालेला. कर्नल साहेबांनी आपली History देता देता मला पण प्रश्न विचारायला सुरवात केली. मला तीन मुले आहेत हे कळल्यावर कर्नल साहेब ६0 वर्षाच्या पूर्वीच्या दुनियेत गेले. Dementic पेशंटना बरेचदा जुन्या आठवणी चांगल्या आठवतात. त्यांनी आपल्या तरूणपणातल्या आपल्या व बायकोच्या आठवणी मला सांगायला सुरवात केली.

त्याच्या आठवणीचा फुटलेला बांध पाहून मी गपचुप ऐकत राहिले. त्यांच्या चेह-यावरचे हास्य व प्रसन्नता सांगत होती की त्यांना बरेच दिवस मोकळेपणाने बोलायला कुणी मिळाले नव्हते.

हा ८९ वयाचा कर्नल अर्ध्या तासाने बाहेर पडला. व मी कुणाला तरी थोडा आनंद दिला हया भावनेने माझ्या ऑफिसकडे परतले.

गेल्या २९ वर्षात माझ्या ब-याच पेशंटमध्ये झालेले बदल पाहणे हा माझ्या जीवनातील एक मौल्यवान अनुभव आहे. आपला भारतीय समाज अमेरीकेत वाढत आहे. पहिल्या पिढीतील लोक आज senior citizen च्या पायरीवर उभे आहेत. आज आपली मुले शिकली. वाढली व वरीचशी भुरकन उडून आपापल्या संसरात व काम धंद्यात रमली आहेत. भारत काय अथवा अमेरीका सगळीकडे संस्कार व culture बदललेले आहे. पूर्वीचे दिवस राहिले नाहीत. लवकरच आपण पण अशाच परिस्थितीतून जाऊ याचा विचारच खूप धक्कादायक वाटतो. प्रत्येकाच्या आयुष्यात एक सायंकाळ येते. ही सायंकाळ कातरवेळ होऊ नये हीच सर्वांना सदीच्छा. आज बरीच मराठी मंडळी एकत्र येऊन याबद्दल चर्चा करत आहेत. हा प्रश्न एक दिवसाचा नाही. हयासाठी समाजाची. कुटुंबाची व एकोप्याची खूप गरज आहे. तरच हयातून आपण काही तरी मार्ग शोधू शकू.

- डॉ. शैला कोदे.



# जत्रा



मुलं आणि ही सारखी जत्रेला जाऊ म्हणून मागे लागली होती. मीच जरा लांबणीवर टाकीत होतो. राजू-संजू जरी जाणते होते तरी पिंकी फारच लहान होती. शिवाय जत्रेला गर्दीही बरीच. शेवटी रविवारी संध्याकाळी आमचं पंचक बाहेर पडलं. मुलांचा व हिचा उत्साह ओसंडून वाहत होता. मुलांनो, अरे हात नीट धरा, आम्हाला सोडून कुठे जाऊ नका, वगैरे सूचना मी देत होतो. राजू तसा समंजस, पण आमच्या संज्या, मात्र नंबर एकचा वात्रट! कोणत्या वेळेस काय करेल याचा नेम नाही. जत्रेचं मैदान तसं घरापासून जवळ होतं म्हणून पायीच निघालो.
मौत का कुवाँ, हंसी घर, डिस्नी लँड वगैरे सारे प्रकार पिंकीला सांभाळत पाहून झाले. एवढ्यात, "काय मस्त वास येतोय नाही बटाटेवड्यांचा!" हिच्या बोलण्यातला रोख लक्षात घेऊन व साऱ्यांनी त्यास पुष्टी देत वडे खाल्ले. पुढे गेलो तर हरतऱ्हेचे पाळणे. मी सहज विचारलं, कशात बसायचं? तर प्रत्येकाचं एक वेगळं मत. शेवटी ही म्हणाली, मुलांनो, साध्याच मोठ्या पाळण्यात बसू रे. मग ती व राजू एका पाळण्यात, पिंकी व संजूस मात्र माझ्याच पाळण्यात बसवून घेतलं. फिरता फिरता पाळण्याने वेग घेतला. पिंकी घाबरून मला बिलगली. राजू-संजू आनंदून गेले. एवढ्यात पाण्याचे शिंतोडे अंगावर येताहेत असा भास झाला. मी आजूबाजूस व वर पाहिलं.
आभाळ तर स्वच्छ होतं. इतक्यात उलटी होतानाचा आवाज आला. पाहतो तर पाळण्याच्या वेगाने हिला उलटी होत होती, अन् त्याचा प्रसाद एकदा आम्हाला व एकदा हिच्या खालच्या पाळण्यातल्या खेडूत जोडप्यास मिळत होता. माझ्या अंगावर सरसरून काटा आला. प्रत्येकजण वर पाहत होतं. मी पाळणेवाल्याला हाताने खूण केली. त्यानेही तोंड वेंगाडत वेग कमी केला. हिला उतरवलं. आम्हीही उतरलो. तोच ते खेडूत जोडपं जवळ आलं. ती बाई म्हणाली, "ए मावश्ये, वकाऱ्या व्हत्यात तर कशापाय पाळण्यात बसायचं?" तो खेडूतही म्हणाला, "आवं माज्या बी अंगावर शिंतोडे उडून वास सुटलाय निस्ता!" हे संभाषण किती लांबलं असतं कोण जाणे. चला सरका, पुढं व्हा, असं म्हणत त्या पाळणेवाल्यानं जणू माझी लाजच राखली.

समोरच्या हॉटेलात चहा-पाणी घेऊन पुन्हा नव्या दमाने आमचा ताफा पुढे सरकला. प्रत्येक लहान-मोठ्या दुकानात ही व मुले थांबत. तिथं खरेदी करण्यापेक्षा हिची चौकशी व घासाघीसच जास्त. रबरी बॉल, फुगे, पिना, कंगवे असल्या फालतू खरेदीस ही विनाकारण वेळ वाया घालवीत होती. मला मात्र त्या खरेदीत अजिबात रस नव्हता. एकतर पिंकीला घेऊन माझा हात भरून आला होता, शिवाय सामानाच्या पिशव्याही होत्याच. त्यात रविवार असल्याने गर्दीपण वाढत होती. सगळं आटोपून लवकर घर गाठावं म्हणून मी म्हणालो, 'उरका गं लवकर, झालं की नाही?'
'थांबा हो जराऽऽ' हिचं ठरलेलं उत्तर.
'हे बघ आता पुरे झालं, पटकन् सिद्धेश्वरांचं दर्शन घेऊ नि घरी जाऊ. चला बरं!'
सुमारे अर्धा-पाऊण तास रांगेत उभं राहून दर्शन घेऊन घराकडे निघालो. समोरच भेळपुरीचा गाडा होता. भेळ खायची ठरली. गाड्यावरही बरीच गर्दी होती. हातात प्लेट येईपर्यंत १०-१५ मिनिटे गेली असती. म्हटलं, तोवर घटकाभर टेकावं, कारण पिंकीच्या वजनाने मीही कंटाळलो होतो.
भेळ खाऊन झाल्यावर निघालो. जरा पुढे गेलो अन् एकदम लक्षात आलं की संजू आमच्या बरोबर नाहीए. हिला म्हणालो, 'अगं संजू कुठाय?'

'अहो, भेळ खाताना तर होता'
आम्ही सगळीकडे पाहू लागलो. त्या गर्दीत मुलाला शोधणं म्हणजे महाकठीण काम होतं. हिच्यावर जरा वैतागून म्हणालो. 'तुला मुलांकडे लक्ष ठेवता येत नाही का?'
त्याला शोधत सगळीकडे फिरू लागलो. काही केल्या पोर दिसेना. परत भेळीचा गाडा होता तिथपर्यंत गेलो. तिथंही नव्हता. निष्कारण जीवाला घोर लागला. हिचाही राग येत होता. जबाबदारी म्हणून कसलीच नाही. नुसती खरेदी अन् बडबड! म्हणून तर साऱ्यांना घेऊन कुठे जाणं नको होतं.
आणखी थोडा पुढे गेलो. रस्त्याच्या कडेने जत्रेतल्या दुकानदारांच्या झोपड्या होत्या. तसा फारसा उजेडही नव्हता. तरी पाहत निघालो. अन् एका झोपडीसमोर संजू मला दिसला. समोरचं ते दृश्य पाहून मात्र मी अवाक् झालो.
झोपडीच्या समोर ४-५ वर्षांची दोन अर्धी उघडी मुलं व दीड-दोन वर्षांची लहान मुलगी दिसली. संजूची भेळची प्लेट त्या दोन मुलांच्या हातात होती व त्यातून थोडीशी भेळ हातात घेऊन संजू त्या लहान मुलीला देत होता.
एवढ्यात नेहमीच्या स्टाईलने ही त्याच्यावर खेकसली. 'संज्या गाढवा, काय करतोस इथं? आम्ही केव्हाचं शोधतोय? ह्याला फारच पुळका सगळ्यांचा!'
हिचं ओरडणं ऐकून मी म्हणालो, 'अगं, अशी ओरडतेस काय? त्या लेकराकडे बघ. तीन मुलांची आई होऊन तुला जे उमगलं नाही ते त्या लहान मुलाला उमगलंय.'
माझा जीव मात्र सुपाएवढा झाला होता. एवढ्या कोवळ्या वयात त्याला ही जाण कुठून आली असेल बरं? आपल्या बरोबरचं कुणीतरी भुकेलं आहे, त्याला आपल्या मुखीचा घास द्यावा वगैरे पांडित्य त्याला सांगता येत नसावं. पण त्यानं कृतीनं करून दाखविलं होतं एवढं खरं. मी पुढे गेलो. मायेनं त्याला उराशी कवटाळलं व आशीर्वादासाठी त्याच्या मस्तकावरून हात फिरवत राहिलो. खट्याळ, वात्रट अशा संज्यातून एका आगळ्यावेगळ्या गुणाचं दर्शन मला घडलं होतं. आम्ही घरची वाट धरली.
घरी आलो तरी त्या विषयाचं कुतूहल मला स्वस्थ बसू देईना. झोपताना मी संजूला विचारलं, 'अरे त्या मुलांना खाऊ देण्याची कल्पना तुला कशी सुचली?'
यावर अतिशय निरागसपणे त्याने सांगितले की, 'अहो बाबा, काल ना वर्गात आमच्या बाईंनी एक छानसा धडा शिकविताना सांगितलं की, दीन-दुबळ्यांना मदत करावी, भुकेलेल्यांना मायेने घास भरवावा. कारण रंजल्या-गांजल्यामध्येच देव वसत असतो. म्हणून मी तसं केलं. आता उद्या मी आमच्या बाईंना व मित्रांना ही गोष्ट सांगणार आहे.'
असं म्हणून शिणलेला संजू माझ्या कुशीत झोपी गेला खरं; पण मला मात्र वाटलं की आज मुलांच्या हट्टाने जत्रेला गेलो नसतो तर संजूतला हा सुप्त गुण मला कळलाच नसता, मग त्याच्या विकासाची धडपड तर लांबच...
पालक म्हणून आपणच कुठेतरी कमी पडतो की काय याचा वेध मन घेऊ लागलं. तसं पाहिलं तर मुलांना शाळेत पाठवून, रोज त्यांची सुरक्षित ने-आण करण्यातच आपण स्वतःला कर्तव्यदक्ष, आदर्श पालक समजून घेत असतो. निदान आव तरी तसाच असतो. स्वतःने स्वतःचीच फसवणूक केल्यागत.
नाही तर संजू मला खऱ्या अर्थाने यापूर्वीच कळला असता. शाळेत मिळत असलेल्या ज्ञान व माहिती बरोबर त्यास अभिप्रेत असणाऱ्या आचरणाशी व अनुभूतीशी सांगड घालण्याची जबाबदारी खरी तर आपलीच. ती जर जोपासली नाही तर मुलं नुसती पुस्तक-पंडित होतील. त्यानं त्यांचं वैयक्तिक जीवन देखील समृद्ध होणार नाही तर मग समाजहित, देशहिताच्या कल्पना तर दूरच...
साठलेलं पाणी गढूळ होऊन निरुपयोगीच होणार! तेव्हा त्याला मोकळं वाहू देणंच फायद्याचं. खडकांशी, झाडाझुडुपांशी टक्कर देत, सलगी करत वाहत राहून ते निर्मळ तर राहिलंच. पण दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची कुवतही बाळगेल.
तेव्हा निश्चय केला की मुलांना अगदी तसंच 'जीवन स्नेही' बनवायचं, अवती-भवती फिरू द्यायचं, चौकटीबाहेर न्याहाळू द्यायचं, त्यांच्याशी संवाद साधायचा; कोणतीही सबब न सांगता!
अगदी सहजपणे घडलेली यावेळची जत्रा, जाणत्यांमध्ये विरळ होत असलेल्या व शिशुवर्गात दडपून जात असलेल्या माणुसकीची जाणीव करून गेली. विचारांना फुलवून व चेतवून गेली.

===========

---- सौ. माधुरी शहा, सोलापूर.

# नववा अध्याय

कॉलेजात असताना Annual Gathering - Regatta हा एक मोठा इव्हेंट असायचा. एका वर्षी प्रमुख पाहुणे म्हणून आम्ही पु. ल. देशपांड्यांना आमंत्रण दिले होते. आणि ते त्यांनी आनंदाने स्वीकारलेही होते.

"कसाबसा बी. ए. पास झालेला माझ्यासारखा माणूस इंजिनीअरिंग कॉलेजमधल्या मुलांना काय उपदेश करणार?" अशी सुरुवात करुन सर्व प्रेक्षकांना त्यांनी तास-दीड तास हसवले होते. हशा आणि टाळ्यांनी वारंवार खंड पडलेल्या त्या भाषणात त्यांनी व्यक्त केलेली एक खंत माझ्या अजून लक्षात आहे.

बऱ्याच विद्यार्थ्यांना ज्ञान आणि शिक्षण यापेक्षा ग्रेड जास्त म्हत्त्वाची वाटते आणि त्यामुळे "दहा मार्कांची बखर, वीस मार्कांचा ज्ञानेश्वर, तीस मार्कांचे गद्य, वीस मार्कांचे पद्य, दहा मार्कांचे व्याकरण इ. विभागणी करुन कुठल्या भागाचा अभ्यास करायचा आणि कुठला भाग ऑप्शनला ठेवायचा हे ते कसे ठरवतात आणि खऱ्या शिक्षणाला कसे मुकतात हे त्यांच्या नेहमीच्या विनोदी पध्दतीने सांगितले होते आणि "तुम्ही सर्व इंजिनीअर होणार असल्याने मराठी हा विषयच ऑप्शनला ठेवणार की काय" अशी भीति व्यक्त केली होती.

पु. ल. देशपांडे चीफ गेस्ट होते त्याच वर्षी पाहिलेल्या एका सिनेमातल्या दोन मित्रांचा "काममे दिल नही लगता? तो साब वॉर्निंग नही देगा तो क्या डार्लिंग देगा क्या?" असा एक डायलॉग - हिन्दी सिनेमात असे "डायलॉग" फार असायचे - मला आठवतो. त्या सिनेमाचे नाव विसरलो. पण एस. डी. बर्मनचे म्युझिक होते व शर्मिला टागोरचा डबल रोल होता हे नीट लक्षात आहे. तिच्या त्या डबल-युवर-प्लेझर डबल रोल मुळे, किंवा त्या हिन्दी सिनेमामधल्या डायलॉगमुळे किंवा पु. लं. च्या त्या उपदेशामुळे, नक्की कशावरून ते आता आठवत नाही, पण "कुठलीही गोष्ट मन लावून करायची. उरका उरकी करायची नाही. नुसत्या पाट्या टाकायच्या नाहीत" असे



मी लगेच ठरवून टाकले होते आणि आजतागायत ते पाळलेलेही आहे. वीस मार्कांच्या ज्ञानेश्वराचा गाढ अभ्यास, व्यासंग वगैरे जरी कधी केला नाही तरी मी तो पूर्णपणे ऑप्शनला टाकला नव्हता.

आपणा मराठी मंडळीना ज्ञानेश्वरीचे खूप कौतुक असले तरी ज्ञानेश्वरी पूर्ण वाचणारे महाभाग कमीच. मीही त्याला अपवाद नाही. ज्ञानेश्वरीचा अभिमान वाटला तरी त्यातले मराठी क्लिष्ट आणि दुर्बोध आहे. ते मराठी सातशे-साडेसातशे वर्षे जुने असल्यामुळे तसे होणे साहजिकच आहे. संतवाङ्मयात, एक रामदासांचा अपवाद सोडला तर, सर्व संतांची उगीचच लांबण लावून बोलायची पद्धत असल्याने संतवाङ्मय वाचन कंटाळवाणे होते.

वि. ल. भाव्यांनी महाराष्ट्र सारस्वतात ज्ञानेश्वरीची व ज्ञानेश्वरांच्या रसाळ मराठीची खूप स्तुती केलेली आहे. नववा अध्याय तर फारच चांगला उतरला आहे असे म्हटलेले आहे. गीता जरी बऱ्याच वेळा वाचून झाली असली - कॉलेजात मी संस्कृत घेतले होते - तरी ज्ञानेश्वरी वाचण्याचे दोन-तीन दुबळे प्रयत्न करुन मी तो नाद सोडून दिला होता. One can stand only so many "तु", "वै" and "पै"! त्यामुळे नववा अध्याय फारच चांगला जमला आहे असे भाव्यांनी का म्हटलेले आहे याची उत्सुकता मला गेली पंचवीस-तीस वर्षे होती.

## चार भावंडे

विठ्ठलपंतानी, म्हणजे ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी, "जा हवा तर संन्यास घ्या" असे बायकोने चिडून म्हटल्यावर पडत्या फळाची आज्ञा असे समजून संन्यास घेतला होता. नंतर खरा प्रकार त्यांच्या गुरुंना कळल्यावर गुरुंच्या सांगण्यावरून विठ्ठलपंतानी परत गृहस्थधर्मात प्रवेश केला. त्यानंतर त्यांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ता अशी चार मुले झाली. ज्ञानदेवांचा जन्म शके ११९२ म्हणजे इ. स. १२७० मधे झाला.

संन्याशाची मुले म्हणून त्या चार भावंडाना जुन्या सनातनी काळात फार त्रास होऊन जिणे असह्य झाले. पण जात्याच हुशार असलेल्या मुलांच्या वेदाभ्यासाच्या व्यासंगावर विश्वास बसून पैठणच्या ब्राह्मणांनी त्यांना शुध्दीपत्र दिले. ज्ञानेश्वरांनी दाखवलेल्या बऱ्याच चमत्कारांचाहि ते मिळण्यासाठी उपयोग झाला असावा.

ज्ञानेश्वरांबद्दल रेड्याच्या तोंडून वेद वदविले, वाघावर बसून त्यांना भेटायला आलेल्या चांगदेवावर इम्प्रेशन मारायला भिंत चालवत आणली अशा बऱ्याच आख्यायिका आहेत. त्यांना आख्यायिकाच म्हणायला हवे कारण या गोष्टी होणे शक्य नाही. त्यावर विश्वास ठेवणे न ठेवणे हा ज्याच्या त्याच्या (अंध)श्रध्देचा भाग आहे. शिवाय ज्ञानेश्वरांना अशा चमत्कारांची गरज नव्हती.

ज्ञानेश्वरांबद्दल बऱ्याच गोष्टी नक्की ठरवता येत नाहीत. मुख्य कारण म्हणजे आपल्याकडचा written records चा अभाव. जी काही माहिती आहे ती ज्ञानेश्वरांचे समकालीन संत नामदेवांनी सांगून ठेवलेली आहे तेवढीच.
पण त्याबद्दलही वाद आहेतच.

जन्म नक्की कधी झाला? निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता ही पाळण्यातली नावे की नाथसंप्रदायात प्रवेश केल्यावर घेतलेली? ज्ञानेश्वरीची "ज्ञानेश्वरी" कशी झाली? कारण ज्ञानेश्वरांनी स्वत:चा उल्लेख "ज्ञानदेव" असा केलेला आहे व सांगितलेल्या ग्रंथाला ज्ञानदेवी असे म्हटलेले आहे. ज्ञानेश्वरी असे कुठेही म्हटलेले नाही. मूळ ज्ञानेश्वरीत किती ओव्या होत्या? ८८९६ की ९०००? ज्ञानदेवाने ज्ञानदेवी नगर जिल्ह्यातल्या नेवासे या गावातल्या देवळात सांगितली का त्यांच्या आपेगाव या जन्मगावी? ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी वयाच्या पंधराव्या वर्षी सांगितली का तिसाव्या?

ज्ञानेश्वरी आणि गीता हे माझे "राखीव कुरण" नाही. दोघींबद्दल अभ्यासू कुतूहल असले तरी मी त्या विषयातला तज्ज्ञ नाही. त्यामुळे माझ्या या लिहिण्यात कमतरता असण्याची शक्यता आहे. उदा. ज्ञानेश्वरांनी ज्ञानदेवी नेवाशात सांगितली याची मला खात्री आहे. कारण उघड आहे. मी नगरचा आहे. आणि नेवासे नगर जिल्ह्यात आहे! अशा काही चुका आढळल्यास विद्वानांनी त्या मला दाखवून द्यायला संकोच करू नये.

ज्ञानेश्वरीच्या आधी गीतेवर चांगली अशी मराठी टीका किंवा भाष्य झाले नव्हते. ज्ञानेश्वरीच्या आधीचा मुकुंदराजाचा याच विषयावरचा "विवेकसिंधु" इच्छुकांनी वाचून बघावा म्हणजे मी काय म्हणतो याची खात्री पटेल.

ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच ज्ञानेश्वर म्हणतात:

"माझा मऱ्हाटाचि बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजा जिंके।

ऐसी अक्षरेचि रसिके। मेळवीन॥"

यावरुन त्या काळीही पैजा लावायची व त्या जिंकायची पध्दत होती असे दिसते. ज्ञानेश्वरांना अमृताशी पैजा जिंकायच्या होत्या. सध्या आपणा मराठी बांधवांची उडी लग्नकार्यात किती जिलब्या किंवा लाडू उठवायच्या अशा पैजांपलिकडे जात नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

ज्ञानेश्वरांनी गीतेचा अर्थ मराठीत सांगून ती पैज जिंकली आहे. गीतेचा अर्थ शब्दशः न सांगता प्रासादिक मराठीत सांगितला आहे. तरी पण ज्ञानेश्वरीचे तत्कालीन प्राचीन मराठी आपल्याला दुर्बोध वाटते. मूळ ज्ञानेश्वरीबरोबर तिचे प्रचलित मराठीत विश्लेषण करणारे किंवा अंजली ठकार यांच्या समओवी सारखे पुस्तक वापरले तर अर्थ समजणे सोपे जाते.

**ज्ञानेश्वरीचे प्रयोजन**

ज्ञानेश्वरांना स्वतःला संस्कृत भाषेचे व वेदांचे पूर्ण ज्ञान होते. मग त्यांना गीतेचा अर्थ मराठीत सांगायची गरज का भासावी?

संन्याशाची मुले म्हणून त्यांना कर्मठ समाजाचा फार त्रास सहन करावा लागला होता. चातुर्वर्णातील शूद्रांपेक्षाही कमी दर्जात त्यांची गणना झाली होती. म्हणून त्यांनी नाथपंथ स्वीकारला होता. कारण नाथपंथात चातुर्वर्णाचा प्रभाव कमी होता. शंकराचार्यांच्या हिन्दू धर्मात स्त्रिया आणि शूद्रांना मोक्षाचा मार्ग मोकळा नव्हता. त्याचेही त्यांना शल्य होते. गीतेवर ज्ञानेश्वरीच्या आधी झालेल्या टीकांमधे सांख्ययोग, कर्मयोग यांचा जास्त समावेश होता. सर्वसामान्य माणसालाच काय पण त्या काळच्या बऱ्याचशा विद्वानांनाही त्या कल्पना अगम्य होत्या. ज्ञानेश्वरांना गीतेत सांगितलेला मोक्षाचा मार्ग संस्कृतचा गंधही नसलेल्या सर्वसामान्य माणसांना, चातुर्वर्णातल्या सर्व वर्णांना व स्त्रियांना दाखवायचा होता. त्यासाठी गीतेचे तत्वज्ञान मराठीतून सांगणे प्राप्त होते.

त्यात ते इतके यशस्वी झाले की ज्ञानेश्वरी हा मराठी वाङ्मयाचा हिरा समजला जातो.

मी पुण्यात चार वर्षे काढली होती तरी आळंदीला (Sorry. "श्रीक्षेत्र आळंदी"ला! देवाच्या गावाला आपण "श्रीक्षेत्र" म्हणतो. मग देवीच्या गावांना आपण "सौक्षेत्र कोल्हापूर" किंवा "सौक्षेत्र तुळजापूर" असे का म्हणत नाही?) जायचा योग आला नव्हता. पाच-सहा वर्षांपूर्वी पुण्याला गेलो होतो तेव्हा अगदीच कधी गेलो नाही असे नको म्हणून मित्राबरोबर जाऊन आलो. रांगेत पुढे एक अशिक्षित दिसणारी बाई होती. समाधीचे दर्शन घेताना तिला गदगदून आले होते व ती अगदी भारावून गेली होती. समाधीस्थानावर डोके ठेवून "माऊली, माझी ज्ञानबा माऊली" करत होती. पुढे सरकायला ती तयार नव्हती. शेवटी तिला आपल्याकडच्या नेहेमीच्या पध्दतीने देवस्थानातील मंडळींनी उद्धट्पणे ओरडून, ओढून पुढे ढकलले.

अशा बहुजन समाजासाठीच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सांगितली होती. व तिचा प्रभाव सातशे वर्षे झाली तरी अजूनही जाणवतो. त्या अशिक्षित बाईला ज्ञानेश्वरी ऐकून गीतेचा अर्थ समजला होता. पण माझ्यासारख्या अर्धशिक्षित माणसाची ज्ञानेश्वरांची ओळख "संत ज्ञानेश्वर" मधल्या "ज्योत से ज्योत लगाते चलो, प्रेमकी गंगा बहाते चलो" या गाण्यापलिकडे गेली नव्हती. म्हणजे माझ्यासारख्या संस्कृत शिकलेल्या "सुसंस्कृत" माणसाला संस्कृत गीतेचा किंवा मराठी ज्ञानेश्वरीचा काही उपयोग झाला नव्हता.

This is my fault. Not Dnyaneshwar's.

**राजविद्याराजगृह्ययोग**

बहुजन समाजाला जर गीतेतल्या तत्वज्ञानाचा परिचय करुन द्यायचा असेल तर त्यातल्या अगम्य द्वैत-अद्वैत, कर्मयोग इ. चा निरक्षर लोकांनाही समजेल अशा साध्या आणि सोप्या भाषेत करुन देणे भाग होते. शिवाय तीर्थ यात्रा, खडतर तपश्चर्या वगैरे करूनच मोक्ष मिळतो या तत्कालीन कल्पनेशी फारकत घेणे आवश्यक होते. त्यासाठी ज्ञानेश्वरांनी कुणालाही सहज साध्य करता येईल अशा भक्तियोगाची योजना केली.

"राजविद्याराजगृह्ययोग" अशा भारदस्त नावाच्या या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला स्वतःबद्दल अंतिम रहस्य ("गृह्य") सांगितले आहे. गीतेच्या या नवव्या अध्यायात चौतीस श्लोक आहेत. गीतेतल्या इतर श्लोकांप्रमाणेच त्यांचा अर्थ एकदाच काय पण दहादा वाचून सुध्दा नीट समजत नाही.

त्या चौतीस श्लोकांच्या मतितार्थाचे पॉवर पॉइंट व्हर्शन असे होईल. Thanks to Microsoft Power Point, now-a-days I can't even go to the bathroom without creating a Power Point bulleted summary first!

- अर्जुना मी तुला हे परमरहस्य सांगतो. ते तुला कळले तर तू सर्व अशुभ गोष्टींपासून मुक्त होशील
- ज्यांची श्रध्दा नसते ते मला प्राप्त करु शकत नाहीत
- मी हे विश्व निर्माण केले आहे. सर्व भुते (elements) माझ्यात आहेत. पण मी त्यांच्यात नाही
- या विश्वाचा जेव्हा नाश होतो तेव्हा ती सर्व भुते

- 
- (elements) माझ्यात विलीन होतात. मी त्यांची पुनःरचना करुन नवीन विश्व निर्माण करतो
- बऱ्याच विद्वानांनाही माझे मनुष्यावतारातले रूप समजत नाही व ते माझी अवहेलना करतात
- पण इतर काही जणांचा माझ्या त्या रूपावर विश्वास असतो व ते माझी भक्ती करतात
- मी सगळीकडे आहे व सगळे माझ्यात असते
- बरेच ज्ञानी लोक वेदाभ्यास, तपस्या इ. करून स्वर्ग प्राप्त करतात. पण माझे खरे रूप न कळल्याने कालांतराने पुन्हा जन्म-मृत्यूच्या चक्रात परततात
- जे लोक माझ्याऐवजी इतर देवांची पूजा करतात ते नकळत माझीच भक्ती करतात. कारण सर्व देवांचा देव मीच आहे
- भक्ति असली की फळे, फुले, पानेच काय पण पाण्यासारख्या किरकोळ गोष्टींनी सुध्दा मी प्रसन्न होतो
- आणि जो कोणी माझी पूजा करतो तो मला प्राप्त करतो. मग तो पापी असो, स्त्री असो किंवा शूद्र असो
- माझी अनन्यभावे भक्ति कर. मला शरण ये. एवढेच केलेस तरी तू मजप्रत येऊन पोहोचशील

गीतेच्या नवव्या अध्यायातील या चौतीस श्लोकांपैकी "पत्रं पुष्पं फलं तोयं" हा श्लोक बहुधा सर्वांना माहीत असतो. पण हे चौतीस श्लोक अगदी to the point असल्यामुळे रूक्ष वाटतात. त्यातच "भगवान विष्णु विश्वाचे कर्ते करविते आहेत व त्यांची श्रध्देने भक्ति केली तर मोक्ष मिळण्याचे चान्सेस वाढतात" यात परमरहस्य कोणते असाही प्रश्न पडतो. I mean duh.. Everyone knows that.

हा प्रश्न फक्त मलाच पडला असे नाही. सर्व श्रोत्यांनाही असणार याची कल्पना ज्ञानेश्वरांनाही होती. त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी ज्ञानेश्वरीतल्या नवव्या अध्यायात दिले आहे.

**नववा अध्याय**

अशिक्षित बहुजनांना गीता समजावी म्हणून ज्ञानेश्वरांनी गीतेतल्या प्रत्येक श्लोकाचे विश्लेषण करताना सामान्य माणसाला समजतील अशी खूप उदाहरणे दिली आहेत. गीतेच्या नवव्या अध्यायातील चौतीस श्लोकांचे विवेचन त्यांनी पाचशे पस्तीस मराठी ओव्यात केले आहे. म्हणजे एका श्लोकाला average २० ओव्या! "एकापेक्षा एक बेबी..." सारखी अनेक उदाहरणे देऊन, घोळवून घोळवून, समजावून गीतेचा अर्थ सांगितला आहे. ज्ञानेश्वर knew how to stay on the message. Communicate. Communicate. Communicate. उत्तमोत्तम अलंकार, उपमा आणि उदाहरणे देऊन त्यांनी अगम्य तत्वज्ञान सुगम केले आहे. ती सर्व उदाहरणे या लेखात देणे शक्य नाही. काही दिली आहेत. त्यावरून त्यांच्या प्रासादिक रचनेची कल्पना येते.

नवव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच ज्ञानदेवानी जमलेल्या मंडळींना मान देऊन, स्वतःकडे (अकारण) कमीपणा घेऊन, मी आपणा थोर मंडळींना तत्वज्ञान सांगणे म्हणजे, "लहान मूल बापाच्या ताटातले अन्न जसे बापालाच भरवायचे प्रयत्न करते" तसे आहे आणि ते तुम्ही "बाप जसा ते कौतुकाने तोंड पुढे करुन खातो" तसे ऐकून गोड करून घ्यावे असे म्हटले आहे. अशी उदाहरणे सुरुवातीला इतकी दिली आहेत की शेवटी निवृत्तीनाथ almost tells him to shut up and get on with it.

गीतेतल्या "कुणालाही माहीत नसलेले, ज्याने सर्व सुखे लाभतात ते गुपित तुला सांगतो" या दुसऱ्या श्लोकाचे, ज्ञानदेवाने "अहो, एक टक्का व्याज मिळणार असेल तरी काही लोक आगीत उडी घ्यायला कमी करत नाहीत. मग त्यांच्यासारख्यांच्या नजरेतून हे सर्वसुखे देणारे गुपित सुटते कसे?" असा प्रश्न विचारून नंतर पुढच्या ओवीत "कमळ आणि बेडूक दोन्ही चिखलात राहतात. पण कमळाचे उत्तम परागकण भुंगे खाऊन जातात. बेडूक मात्र माशांवर समाधान मानतो. गायीच्या आंचळात दूध असते. पण गोचीड मात्र ते न पिता गायीचे रक्तच पितो. काही लोकांना चांगले आणि वाईट यातला फरकच कळत नसेल तर त्यांना सर्वसुख देणाऱ्या गुपिताचे काय?" असे त्याचे उत्तर दिले आहे.

हल्ली आपण जसे व्याजात फक्त १/४ % फरक असला तरी पैसे या बँकेतून त्या बँकेत ट्रान्स्फर करण्यात हयगय करत नाही तसलाच प्रकार. Don't see the forest for trees.

"माझ्यात सर्व भुते (elements) असतात पण मी त्यांच्यात नसतो" या श्रीकृष्णाच्या विधानाचे

"खळखळणाऱ्या पाण्यावर फेस असतो पण तो फेस पिऊन कुणाची तहान भागत नाही. कारण पाण्यावर फेस असतो पण फेसात पाणी नसते" या उदाहरणाने समजाविले आहे.

भगवान श्रीकृष्ण जातीभेद, वर्णव्यवस्था, स्त्री-पुरुष यांच्यात भेदभाव करत नाहीत हे सांगताना "म्हणोनि जाति न येथ प्रमाण।भक्तीचीच सरशी॥" असे सांगून ज्ञानदेवांनी, "ओढे, ओहोळ इ. सर्व गंगेस मिळाल्यावर गंगारूप होतात" असे उदाहरण दिले आहे. सामान्य माणसाला समजतील अशी अनेक उदाहरणे नवव्या अध्यायात आहेत. ती सगळी येथे देणे शक्य नाही आणि त्याची आवश्यकताही नाही.

गीतेतल्या नवव्या अध्यायातल्या विसाव्या श्लोकात इंद्रलोकाचा "ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगात" असा त्रोटक उल्लेख आहे. पण ज्ञानदेवांनी त्यांच्या "सुधारून वाढवलेल्या" मराठी आवृत्तीत कल्पनेच्या भराऱ्या मारून वर्णन केलेल्या स्वर्गाचे समओवी रूप असे आहे:

जेथ अमरत्व हेच सिंहासन।ऎरावतासारखे वाहन।राजधानी भुवन अमरावती॥

जेथ महासिध्दींची भांडारे।अमृताची कोठारे।ज्या गावी खिल्लारे।कामधेनूंची॥

ज्या स्वर्गी देव चाकरी करीत।चिंतामणिरत्नांची भूमी जेथ।आणि आनंदउद्याने असत।कल्पतरूंची॥

गंधर्व गात गाणी।रंभेऎशा रिझविती नर्तनी।आणि किती एक विलासिनी।त्यात मुख्य ऊर्वशी॥

मदन सेवी शेजघरी।चंद्र सडाशिंपण करी।चपळ संदेशधारी।वारा जेथ॥

आशिर्वादा बृहस्पतिऎसे ब्राह्मण।चिंतिती जे कल्याण।आणि पंक्तीशी सुरगण।बहुत जेथ॥

जेथ अष्टदिक्पाळ धुरंधर।अश्वारुढ सरदार।उच्चैःश्रवा धावे पुढार।अश्व इंद्राचा॥

बहु असो, हे ऎसे।भोग इंद्रसुखाजैसे।भोगती यज्ञकर्ते, जोवरि असे।पुण्याचा अंश॥

Try beating that.

वेळ काढून नववा अध्याय वाचल्यावर "ज्ञानेश्वरीचा नववा अध्याय फारच चांगला जमला आहे" हे भाव्यांचे मत पटते.

Taking thirty years to confirm it is somewhat constipated. Better late than never, however.

अरुण निसरगंड
बेलेव्ह्यू, वॉशिंग्टन
arun.nisargand@comcast.net

# Avoid Plastic



नुकताच ‘लोकसत्ता‘ मधील ‘कचरा मुक्ती... एव्हरेस्टचरील‘ हा लेख वाचला अन क्षणभर डोळ्यसमोर काजवे चमकले. जगातील सर्वात उंच शिखर पादाक्रांत केले जात असल्याच्या अभिमानाच्या बातम्या वाचताना उर भरुन येतो. परंतु जगातील सर्वात उंच शिखरही मानवाने कच–याविना सोडले नसल्याचे वाचून मनही खिन्न होते. नुसता कचरा असेल तर ठीक आहे. त्यापासून ‘खत‘ बनविता येईल परंतु तो कचरा जर प्लॅस्टिकयुक्त वस्तू व पिशव्यांनी व्याप्त असेल तर आपण प्रदूषणाला आळा कसा घालणार? या प्लास्टिकच्या पिशव्यांच्या अतिवापरामुळे उद्योगधंदे तेजीत चालतील परंतुयामुळे जागतिक पर्यावरणाचा समतोल ढळत आहे,याकडे मात्र आपले सरळ सरळ दुर्लक्ष होत आहे. ग्रामीण असो वा शहरी प्रत्येक ठिकाणी प्लॅस्टिक पिशव्यांचा सर्रास वापर आढळून येत असताना पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने शंभर टक्के प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर बंदी घालून पर्यावरणाचा ऱ्हास व कच–याची समस्या सोडविण्यासाठी एक चांगले पाऊल उचलले आहे.

शॉपिंग करण्याची हौस नसलेली व्यक्ती विरळाच. परंतु शॉपिंगला जाताना कापडी पिशवीचा भार मात्र फॅशनच्या जमान्यात सर्वांनाच अडसर ठरत आहे. अन त्यामुळेच कच–याच्या समस्येला प्लॉस्टिकच्या पिशव्यांनी ग्रासले आहे,असे म्हणटले तरी वावगे ठरु नये. या महाभयानक रोगाने ग्रासलेल्या रोगावर वेळीच इलाज करायचा दृढनिश्चय केला तर प्लॅस्टिक पिशव्या नाकारा एवढच आवाहन करता येईल. अन हे आवाहन अवहेरलं,तर प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरामुळे जागतिक पर्यावरणाचा समतोल तर ढळेलच त्याचबरोबर मुक्या, जलचर,भूजलचर व आकाशात विहर करणा–या पशुपक्ष्यांच्या मृत्यूस आपणच कारणीभूत ठरु अन एक दिवस असा येईल (!) की आपण या पशू–पक्षी धनालाच मुकू. एवढेच नव्हे तर तेलाच्या वापरालाही अनिर्बंध राहिल.अतितेलाच्या वापरासाठी अमाप पैसा खर्च करावा लागेल कारण या पिशव्या बनविण्यासाठी पॉलिथिन हे तेल लागते. थर्माप्लस्टिक ऑइलशिवाय बनू शकत नाही.आपण प्लॅस्टिकचा वापर कमी करु तेवढी तेलाची बचत करु शकू त्यातूनच अमाप पैशाचा खर्च आपण टाळू शकू.आपण ज्या प्लॅस्टिक वस्तू वा पिशव्य वापरतो त्यातल्या फक्त १ टक्केच पिशव्या पुनःप्रक्रिय करुन वापरण्याजोग्या असतात आणि उत्पादन खर्चापेक्षा त्याचा खर्चजास्त असतो,असे एका संकेतस्थळावर वाचण्यात आले. त्यात पुढे असे म्हणटले आहे की, प्लॅस्टिक पिशव्यातील सूक्ष्म स्वरुपातील काही अन्न साठविण्यात येणा–या पिशव्यातून अन्नात शिरकावा करु शकतात. अन हे जर सत्य असेल तर किमान स्वतःच्या जीवाशी खेळणेतरी आपण टाळायाला हवे की नको? याचाही विचार व्हायला हवा.

एका संकेतस्थळावर नॅशनल जीओग्राफिक न्यजने प्रकाशित केलेल्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की,अमेरिकेतील पर्यावरण संवर्धन समितीने (united states environment protection agency) जगभर वापरल्या जाणा–या प्लॅस्टिक पिशव्यांची पाहणी केली असता ५०० अब्जावर या पिशव्यांचा वापर होत असल्याचे आढळून आले आहे. हे टाळण्यासाठी जसे प्रशासनाने वापरावर निर्बंध घालणे आवश्यक आहे त्याहीपेक्षा आपण प्लॅस्टिक मुक्त पर्यावरणाला कसा हातभार लावतो त्यावरच पर्यावरणाचा समतोल अवलंबून आहे.सर्वसाधारण पाहणीतून असे आढळून आले आहे की, जर आपण कापडी अथवा कागदी पिशव्यांचा वापर केल्यास एका व्यक्तीकडून किमान सहा प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा आठवडयास, २४ पिशव्या एका महिन्याला, २८८ पिशव्या वर्षात,तर २२१७६ पिशव्या आयुष्यभरात वापरण्याचे टाळू शकतो व त्यातूनच प्लॅस्टिकमुक्त कचरा व पर्यावरण याला हातभार लावू शकतो,हे जागतिक पाहणीतून आढळून आले आहे.




पुणेकरांनी पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी व मुकया जनावरांच्या पोटात नकळत जाणा–या प्लॅस्टिक पिशव्यांचा

वापर बंद करा ,असे विविध मार्गाने सेवाभावी संस्थांनी आपल्याला अवगत केले. पथनाटयाद्वारे,आकाशवाणी,दूरदर्शन,वृत्तपत्राच्या माध्यमातूनही आपल्याला सावधानतेचा इशारा दिला असला,तरी त्याची दखल मात्र पुणेकरांनी घेतलेली दिसत नाही.प्लॅस्टिक पिशव्यांच्या अतिवापरामुळे कच-याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. उरुळी-फुरसुंगी येथील कचरा डेपोत जमा होणारा कचरा ही समस्या नुसती शहरापुरतीच मर्यादित राहिलेली नसून, परिसरातील ग्रामीण भागातालि आरोग्य धोक्यात येण्यास कारणीभूत ठरत आहे. कारण तेथील कच-याचे विघटन करीत असताना प्लॅस्टिक पिशव्यांमुळे अनंत अडचणी निर्माण होत आहेत.एक काळ असा होता की,शेतकरी ओला कचरा मोठया प्रमाणात विकत घेऊन जात व त्याचा खत म्हणुन वापर करायचे.परंतु आता कचरासुद्धा शुद्ध स्वरूपाच्या ऐवजी भेसळमस्वरूपात (अर्थात प्लॅस्टिक मिश्रीत) मिळत असल्याने तो घेण्यास शेतकरी नकार देत आहेत.अन तेही योग्यच आहे.कारण 'काळ्या घशात' असले भेसळयुक्त खत घातले तर ती कालांतरणे कोपल्याशिवाय राहणार नाही'.किंबहुना ती काळी आई काही काळाने नापीक होण्याचीच शक्यता आहे. अन असेच होत राहिले तर तुम्हा-आम्हा तोंडचा घास पळाल्याशिवाय राहणार नाही! त्यामुळे यावर गांभीर्याने विचार करून कृती करायला हवी.(म्हणजे प्लॅस्टिक पिशव्यांचा वापरच टाळणे)

मागील दोन महिन्यात पुण्यातील कच-याच्या समस्यांची नोंद सर्वच प्रसिद्धी माध्यमांनी घेऊन त्याची माहिती सर्वांपर्यंत पोहचवली.परंतु ही समस्या फक्त पुण्यापुरतीच मर्यादित आहे असे समजुन इतर शहरातील प्रशासनाने जर याकडे 'काना डोळा' केला तर शहरपातळीवरच नव्हे तर कालांतराने राज्य ,राष्ट्रपातळीवरही डोकेदुखी ठरणार आहे. मग इतर ठिकाणचे काय घेऊन बसलात हे प्रत्यक्ष चित्र आपलसमोर आहे.

सॅन फान्सिस्की या शहराने प्लॅस्टिकच्या पिशव्यांमुळे होणारा पर्यावरणावर दुष्परिणाम अन त्याच्या निर्मितीसाठी होणारा खर्च या बाबींचा विचार करूनच २७ मार्च २००७ पासून यावर बंदी घातली आहे.बांगलादेश,चीन,आयरलँड,इस्त्रायल,कॅनडा,कीनिया,टांझानिया, साऊथ आफ्रिका,सिंगापूर आदी ठिकाणी प्लॅस्टिक पिशव्या वापरण्यावर निर्बंध घातले आहेत,असे एका संकेतस्थळी नमूद केले आहे.

हे लिहित असतानाच पुण्यात या पिशव्यांवर बंदी घालण्याचा निर्णय महापालिकेतील स्थायी समितीने घेतल्याचे वृत्त वृत्तपत्रातून धडकले ,अन खरच काही अंशी समाधान झाले ते किमान कच-याच्या समस्येमुळे का होईना हा निर्णय झाला.

महापालिकेने हा स्तुत्य निर्णय घेतला हे योग्यच झाले कारण पुणे हे शिक्षणाचे,संस्कृतीचे माहेरघर म्हटले जाते.तसेच देशातील 'पहिलं-वहिलं' जे काही असेल त्याची सुरूवात पुण्यातूनच होते व त्यास उत्तम प्रतिसाद मिळतो असे म्हटले जाते.तद्वतच महापालिकेने प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.त्याची अंमलबजावणीही तातडीने करावी.याचबरोबर एका ग्रामीण भागातालि सेवाभावी संस्थाने (लोककल्याण प्रतिष्ठान-फुरसुंगी) केलेल्या मागणीप्रमाणे शहर व ग्रामीणस्तरावर शासनाच्या वतीने पर्यावरण संवर्धन समिती व मंडळे स्थापन करून त्यासाठी विशिष्ट असा राखीव निधी ठेवून 'कच-या'संदर्भात ओला व सुका कच-याचे विघटन कसे करायचे याचे प्रबोधन करून वेगळी यंत्रणा राबवावी व प्लॅस्टिक पिशव्या देणा-या व घेणा-यावर करडी नजर ठेवून दंडात्मक कारवाई करावी.

ही बाब खर्चिक असली तरी काळाची गरज समजून याकडे पाहिले पाहिजे व तशा योजना राबविल्या पाहिजेत,एवढे मात्र नक्की. वैयक्तिक निर्णय घेऊन नागरिकांनी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळला तर पर्यावरणाचा होणारा ऱ्हास ,पिशव्या निर्मितीसाठी होणारी करोडोची बचत तसेच तेलाचा वापर कमी होऊन आर्थिक बचत तर होईलच त्याचबोबर पशू-पक्षी,भूजलचर,आकाशात विहार करणा-याच्या मृत्यूस आपण कारणीभूत ठरणार नाही,हेही तेवढंच खरं.

**-सुधीर मेथेकर**

शाळा सुरू होते. पहिल्याच तासाला शिक्षक मुलांची ओळख करून घेताना एका मुलाला विचारतात, ''तुझे वडील काय करतात?'' मुलगा सांगतो, ''आई सांगेल ते काम करतात!''



# सतारीचे बोल

शाळा म्हटली की काही गोष्टी शिकाव्याच लागतात. कविता पाठ करणे, त्यांना चाली लावून वर्गात बेसूरपणे गाव्या लागणे हे कोणालाही चुकत नाही. प्राथमिक (म्हणजे elementary) शाळेत मुले "देवा तूऽझे कीऽऽऽऽति सुंदर आकाश" अगदी बेंबीच्या देठापासून ओरडून म्हणतात. आणि हायस्कूलमधे हिन्दीच्या सरांना "आओ बच्चो तुम्हे दिखाए झांकी हिन्दोस्तानकी" म्हणत कवी प्रदीपचा अवतार घ्यावा लागतो. कविता शिकण्याचे परिणाम (किंवा दुष्परिणाम) can last a lifetime.म्हणूनच की काय पण "धीर धरी रे धीरापोटी असती मोठी फळे गोमटी" हे "बोल" तीन चार महिन्यांपूर्वी मला अचानक आठवले. का ते कळायला मार्ग नाही कारण केशवसुतांचा मी मोठा फॅन आहे असे नाही. हायस्कूलमधे असताना नगरकर सरांनी सतारीचे बोल शिकवली होती. खरं म्हणजे नगरकर सर आम्हाला इंग्रजी शिकवायला होते. पण त्यांना मराठी शिकवणे जास्त आवडायचे. म्हणून एक दिवस लहर आल्यावर इंग्रजी बाजूला ठेवून ते सतारीच्या बोलावर घसरले होते.

शाळा कॉलेज नंतर केशवसुतांच्या कविता आवडायला लागल्या असल्या तरी हायस्कूल मधे असतांना केशवसुतांचे आणि आमचे फारसे सख्य नव्हते. Mostly because of our typical high-school-boys juvenile tendencies. एकंदरीत कुठल्याही प्रसंगाचे गांभीर्य जरा कमीच असल्याने, आनंदीबाईनी जसा ध चा म केला होता तसा आम्ही तु चा मु करुन केशवसुतांच्या "तुतारी" चे एक विडंबनही केले होते. मराठीच्या सरांना ते कळल्यावर त्यांनी आम्हाला वर्गाबाहेर काढले होते व "पालकां" कडून चिठ्ठ्या आणायला लावल्या होत्या. त्यामुळे सतारीच्या बोलाचे "Hatari चे बोल" असे Hatari सिनेमातल्या Baby Elephant Walk च्या चालीवर विडंबन करायचा प्रयत्न आम्ही सोडून दिला होता.

"सतारीचे बोल" मधे काही कारणाने भडकलेल्या कवीला रात्री एका खिडकीतून सतारीचे स्वर ऐकू येतात. पण त्याचा मूड चांगला नसल्यामुळे त्या दिडदा, दिडदांची त्याला चीड येते. पण हळू हळू सतारीच्या त्या मधुर स्वरांचा त्याच्यावर परिणाम होऊन त्याचे डोके शांत होते व शेवटी त्या स्वरांचा राग जाऊन तो त्यांचे गोडवे गायला लागतो. एकंदरीत "खिला जो मेरा दिल तो सारी बगिया खिली".

केशवसुतांनी सतारीचे "बोल" represent करण्यासाठी दिडदा, दिडदा हे शब्द का निवडले हा तेव्हा पडलेला प्रश्न मला अजूनही कधी कधी सतावतो. माझ्या मते दिडदा, दिडदा व्हायोलिनच्या स्वरांना शोभून दिसतील. व्हायोलिनचे स्वर कसे long and continuous असतात. सतारीचे स्वर

तारा खाजवल्या ("pluck") मुळे short and interrupted असतात. More like दिड, दिड than दिडदाऽऽ, दिडदाऽऽ. दिडदा, दिडदा चा फारतर लहान मुलांना भीति दाखवायला उपयॊग होईल. "आता झोपतॊस मुकाट्याने का करु दिडदा, दिडदा?" त्या मानाने सतारीचे बोल कसे कोमल आणि नाजुक असतात. Very inviting.

केशवसुतांनी शंभराच्यावर कविता लिहिल्या असल्यातरी त्यांच्या तुतारी, आम्ही कॊण, झपूर्झा आणि सतारीचे बोल एवढ्या तीन चारच कविता बहुतेकांना माहिती असतात. सतारीच्या बोल मधल्या "स्वर ते दिडदा दिडदा" आणि "धीर धरी रे धीरापोटी असती मोठी फळे गोमटी", तुतारीमधल्या "एक तुतारी द्या मज आणुन, फुंकिन जी मी स्वप्राणाने", आम्ही कोण मधल्या "आम्ही कोण म्हणुन काय पुसता, आम्ही असू लाडके देवाचे..", या केशवसुतांच्या signature ओळी आहेत. कवी यशवंत यांच्या "आलो मी आलो मी करी पुकार कोण तरी" claptrap पेक्षा त्या दसपटीने चांगल्या असल्या तरी त्यांना भा. रा. तांब्यांच्या "डोळे हे जुलमी गडे रॊखुनी मज पाहू नका" किंवा "रामकृष्णही आले गेले का जग त्याविण ओसची पडले", माधव जुलियनांच्या प्रेमगीतांची किंवा even मर्ढेकरांच्या "पिपात पडले ऒल्या उंदिर" च्या साहजिकतेची सर नाही. अर्थात अव्वल इंग्रजी अंमलात लिहिलेल्या काही पोटभरू कवितांपेक्षा केशवसुतांच्या कविता चांगल्या आहेत. "सत्य सदा बोलावे सांगे गुरु आणि आपुला बाप" अशा literary दरिद्रीपणा पेक्षा "एक तुतारी द्या मज आणुन, फुंकिन जी मी स्वप्राणाने" नक्कीच चांगली आहे.

No matter. For me तुतारी is cacophony of teenagers practicing kettle drums in the garage while सतारीचे बोल has the allure of Mahashweta's sitar strains yearning for Chandraapeed.

दिडदा दिडदा or no दिडदा दिडदा, sitar is sweet. हार्मोनियम बोकाळण्याची आधी हिन्दुस्तानी संगिताला सारंगी, वीणा, सतार यांचीच साथ असायची. शंकर-जयकिशनने वेस्टर्न स्टाईल ऑर्केस्ट्रा वापरायला सुरुवात करायच्या आधी हिन्दी सिनेमातल्या बऱ्याच गाण्यांना सतारीची साथ असायची. हल्लीच्या मराठी किंवा हिन्दी गाण्यात सतार नसतेच.

"फार साईड" कार्टून काढणारा लोकल कार्टूनिस्ट गॅरी लार्सनचे दोन पॅनेलचे एक कार्टून मला आठवते. त्याच्या एका पॅनेलमधे स्वर्गात जाण्यासाठी रांग लागलेली असते. त्यात देवदूत "Welcome to heaven. Here is your harp" म्हणत स्वर्गात येणाऱ्यांचे हार्प देत स्वागत करत असतो. दुसऱ्या पॅनेलमधे नरकात जाणाऱ्यांची रांग असते. त्यात डेव्हिल "Welcome to hell. Here is your accordian" म्हणत नरकात येणाऱ्यांना पियानो ऍकॉर्डियन देत असतो. A really funny cartoon when you actually see it.

त्या कार्टूनचे इंडियन व्हर्शन करायचे झाले तर "Welcome to heaven. Here is your sitar" आणि "Welcome to hell. Here is your harmonium" असे होईल. Too bad that musically impure harmonium has crowded out classical Indian musical instruments such as sitar and sarangi as accompaniments. I like harmonium. But sitar takes the cake.

सतार किंवा तिची धाकटी बहीण वीणा यांचा माझा जवळून परिचय नाही. नाजुक हातांनी त्यांच्यावर केलेली करामत ऎकण्यासारखी असली तरी एकंदरीत त्यांचा आकार, ते भोपळे बघून त्यांचा उपयोग फक्त भीमपलास वगैरे मर्दानी रागांसाठीच होत असावा असे उगीचच वाटते. आणि अगदीच सतार शिकणे जमले नाही तर rec room मधे ठेऊन त्यांचा वेट लिफ्टिंगसाठी वापर करता येईल का असा प्रश्न पडतो. Guitar for Dummies सारखा Sitar for Dummies शिकवणारा एखादा सांदिपनी किंवा द्रोणाचार्य भेटला तर माझी एकलव्यासारखी अंगठा कापून गुरुदक्षिणा द्यायची माझी तयारी आहे. Not that I have any idea whether one needs an opposable thumb to play a sitar. Or maybe barter sitar lessons for lessons in Stability and Control Issues in Flight Test Airplanes or Optimization Topics in Linear Programming. May not be a fair trade. But that's all I have to offer.

सतारीच्या मधुर बोलांची साथ असलेली तीन चार जुनी गाणी अजूनही पॉप्युलर आहेत. "ओ सजना बरखा बहार आयी’ या गाण्याची सुरुवात सतारीच्या बोलांनी होते. ते स्वर इतके सुरेल आहेत की ते संपून लता मंगेशरकरचा आवाज कुठे सुरु होतो हे लक्षातसुध्दा येत नाही. सतारीचे ते बोल, "मधुबनमे राधिका नाचे रे" च्या शेवटी असलेला सतार सोलो, किंवा "जे वेड मजला लागले, तुजलाही ते लागेल का" या मराठी गीतातले सतारीचे चार-पाच बार्स can keep me up all night.


सतारीचे अमेरिकन बोल कसे वाटतील असा विचार बऱ्याच वेळा येतो. In good hands they will be as good if not better than our Indian classical sitar. How about a holiday sitar concert of Christmas carols? Jingle Bells may make a great Indo-American sitar tune.

Late night sitar strains on a serene winter night have the same pull Mahashweta's sitar - more likely it was a veena - had on Chandraapeed lost in the woods. And if you throw in the lyrics of Lata Mangeshkar's "Na jeo na", the Bengali version of "O sajana barakha bahar aayi" melody which roughly translates as

No! Please dont go,
It's still night
I still have something to give you
The night birds says
Please don't go...

those sitar strings have the power of transforming सतारीचे बोल into सतार काळजात घुसली.

- अरुण निसरगंड
बेलेव्ह्यू, वॉशिंग्टन



रांगोळी : अमृता शहा




मेंहदी : गौरी शहा


# संक्रमण




रविवारी सकाळी चहा घेत पेपर वाचत बसलो होतो. ही म्हणाली अहो, आज  आमच्या मंडळाची मीटिंग आहे बरं का!
कॉलनीतल्या सगळ्या महिलांसाठी एक महिला मंडळ स्थापलेलं होतं. मंडळ कसलं याचं? गोंधळ नुसता! काही सामाजिक काम नाही की विधायक कार्य नाही. नुसत्या फालतू गप्पा, एकमेकांची उणी-दुणी किंवा पोकळ स्पर्धांचं आयोजन! स्पर्धांना तरी ऊत आला होता. स्पर्धा कसली? तर म्हणे, चपलांचा ढीग करायचा त्यातून नवऱ्याने बायकोच्या व बायकोने नवऱ्याचा चपलांची जोडी शोधून, जो पहिला पोचेल त्याला पहिले बक्षीस! काहीतरी निरर्थक.
एकदा शेजारचा सारोळकर आला व म्हणाला, "पेढे दे. " "कसले? " "अरे वहिनींना स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालंय. "
"अस्सं? कोणत्या? " मी आश्चर्याने विचारलं.
तो म्हणाला, 'वाद-विवादाच्या'.
हे ऐकून मात्र मनातून मी खजील झालो. या ऐवजी वक्तृत्वाच्या असत्या तर नक्कीच पेढे वाटले असते. पण हसत हसत म्हटलं, अरे खरं तर हे बक्षीस तिला फार पूर्वीच मिळायला हवं होतं. आमच्या घरात देखील तीच याचं बक्षीस पटकावते. काही का असेना, या स्पर्धेपासून ती मंडळाची सेक्रेटरी झाली होती एवढं खरं.
मी काही बोलत नाही हे पाहून ती म्हणाली, 'अहो ऐकलंत ना? ' 'हे आता कोणत्या स्पर्धा ठेवणार? ' मी वाचत म्हणालो.
अय्या, तुम्ही कसे ओळखलंत?
तुमचं मंडळ दुसरं काय करतं?
नाही हं माझ्या हातात बॅट आहे तोवर मी चौफेर फटकेबाजी करणार आहे.
म्हणजे? मी म्हणालो.
अहो, मी सेक्रेटरी असे पर्यंत हो.
अगं पण प्रत्येक वेळा पाककलेच्या स्पर्धाच कशाला? कधी तरी मुलांसाठीही काहीतरी ठेवावं म्हणजे कथा-कथन, सामान्य ज्ञान, पाठांतर, राम-रक्षा, गीतेचे अध्याय, अशांनी बुद्धीला जरा चालना तरी मिळेल किंवा ज्या महिला खाण्याचा एखादा पदार्थ चांगला बनवितात तो मोठ्या प्रमाणावर करून अनाथाश्रम, अंधशाळांना वगैरे जाऊन अन्नदान करा. सत्कार्य तरी होईल.
जाऊ द्या हो. तसलं कटकटीचं काही नको बाई. मेल्या शिष्ट आहेत सगळ्या. कधी असला एखादा प्रस्ताव मांडलं की हात झटकून मोकळ्या होतात. पण पाककला स्पर्धा म्हणताच मधमाश्या सारख्या गोळा होतात.
हिच्या समोर काही बोलण्यात तसा अर्थच नव्हता. बरं मग. कोणते पदार्थ ठेवणार?
हे बघा रव्याचा गोड पदार्थ व तांदळाचा तिखट पदार्थ. चला ठरलं तर मग. आज जाहीर करते. हिचा हुरूप पाहून मी म्हटलं, असले उद्योग केल्यापेक्षा सुट्टीत मुलांचा अभ्यास घे जरा.
ते अभ्यासाचं तुम्हीच बघा बुवा. ती कार्टी काही माझं ऐकत नाहीत. एवढं म्हणून बाईसाहेब मोकळ्या झाल्या.
स्पर्धेचा दिवस ठरला, सगळा स्त्री वर्ग कामात गर्क झाला. मुले पिशव्या घेऊन बाजारात पळू लागली. प्रत्येकाच्या घरातून तेलकट, तुपकट, खमंग असा वास येऊ लागला. रव्याचे लाडू नि तांदळाची चकली असे हिचे पदार्थ ठरले. घरात रोज एक नमुना होऊ लागला. एक दिवस हिने डिश मध्ये सुरेख सजवून लाडू आणले. मी म्हटलं, “अरे वा! सजावट तरी छान झालीय. आता चव बघू ,” म्हणून लाडू खायला लागलो पण काही केल्या तो फुटेना. हे काय गं?
थांबा हं मी फोडते.
पण हिचाही जोर अपुरा पडला. मुले दातांनी चावून खायचा प्रयत्न करू लागली. शेवटी मंगेशनं जमिनीवर आपटून फोडला व साऱ्यांना खायला दिला. “असले कडक लाडू तू स्पर्धेला ठेवणार? अगं, हा लाडू इथून एखाद्याच्या अंगावर नेम धरून मारला ना तर तो जखमी होईल, पण तुझा लाडू तसाच राहील.” माझ्या या वक्तव्यावर मुले खो खो हसू लागली. हिनं चिडून धाकट्याच्या पाठीत धपाटा घातला. त्याने भोकाड पसरलं. ही हिरमुसली. मी जरा समजावण्याच्या स्वरात म्हटलं, “अगं चव चांगली आहे. फक्त

जरा मऊ होतात का ते बघ." चकलीचं असं होऊ देऊ नकोस. हिने मान डोलावली.
स्पर्धेच्या दिवशी दुपारी दोनलाच मी घरातून पळ काढला व दुपारच्या पिक्चरला जाऊन बसलो. म्हटलं नसती कटकट नको. संध्याकाळी सहा-साडेसहाला आलो तेव्हा आमच्या कॉलनीतल्या कॉमन हॉल मधून जोरजोराचा आवाज येत होता. अरे , स्पर्धा सोडून हा कसला आवाज? म्हणून मी आत डोकावला तर हिचा व साठे वहिनींचा कडाडून वाद चालला होता. मी मंगेशला म्हटलं "अरे काय झालं?" "बाबा, अहो बक्षिसाच्या क्षुल्लक कारणावरून दोन गटांत जो वाद चाललाय तो केव्हाचा. कुणीच कोणाचं ऐकत नाही." दूरून श्रीमान साठे माझ्याकडे पाहत होते. अतिशय सज्जन गृहस्थ ! यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे असं मी ठरविलं.
एकंदरीत वातावरण पाहिलं व मंगेशला म्हणालो, "मंग्या, अरे जोरात शिट्टी वाजव बरं." पडत्या फळाची आज्ञा! मंग्याने ती इतक्या जोरात वाजविली की त्या भांडणाऱ्या दोघींसह सगळ्यांनीच त्या आवाजाच्या दिशेने पाहिलं. साऱ्यांचं स्पर्धेचं वेड लक्षात होतंच. मी म्हणालो, "हे बघा मंडळी, सध्या जे काही चाललंय त्याला आपण या वादविवादाच्या स्पर्धाच आहेत असं जर समजलं तर त्याचं पहिलं बक्षीस कोणाला द्यावं असं तुम्हाला वाटतं?" माझी ही कल्पना पाहून साठेंनी माझ्याकडे पाहत डोळे मिचकावले. मीही त्यांना प्रतिसाद दिला.
' स्पर्धा ' हा शब्द ऐकताच वातावरणाचा सारा नूरच पुन्हा बदलला. सारे एकदम शांत होऊन हलक्या आवाजात आपापसात कुजबुजे लागले. सध्याचे युग हे स्पर्धेचे अन त्यानिमित्ताने मिळणाऱ्या बक्षिसाचे आहे हे मला ठाऊक होते पण त्या स्पर्धांनी लोकांना इतकं वेडंपिसं बनवलं असेल याची मलाही कल्पना नव्हती. बहुधा माझा घाव अचूक लागला असावा. आता साहजिकच दोन्ही गटांतून विरुद्ध पार्टीची नावे येऊ लागली. पेच निर्माण झाला. नेमकं कोणाचं नाव जाहीर करावं कळेना. म्हटलं आता पुन्हा वाद सुरू होणार. एवढ्यात साठे हसत म्हणाले, 'शेळके, पहिलं बक्षीस दोघांनाही विभागून दिलं तर योग्यच होईल ना?' आणि ही कल्पना मात्र साऱ्यांनीच उचलून धरली. सगळीकडे हास्य -कल्लोळ पसरला. हिप हिप हुर्ये! मुलं दंगा करू लागली. साठेंनी अप्रत्यक्षपणे दोघींचीही उडविलेली खिल्ली घालून लगेचच त्यांनी घर गाठलं.
दुसऱ्या दिवशी हलक्या आवाजात ही मला म्हणाली, "अहो, काल जे काही झालं ते व्हायला नको होतं ना?" मी रात्रभर विचार केला. तुमचंच म्हणणं पटलं," बघा आता. उगाच असल्या स्पर्धा घेऊन त्यात वेळ व शक्ती वाया घालवून, एकमेकींची मनं कलुषित केल्यापेक्षा स्पर्धेच्याऐवजी सर्वांनी मिळून सण-वार प्रसंग पाहून खाद्यपदार्थ बनवून एखाद्या अनाथ आश्रमाला किंवा अंधशाळेला भेट देणं, अशिक्षितांना साक्षर करणं, संस्कार वर्ग यात रस घेणंच योग्य होईल. मग तर तुमची मदत होईल ना? "
मी स्वप्नात तर नाही ना म्हणून स्वतःलाच चिमटा काढून पाहिला व भानावर येऊन म्हणालो," खूप आनंद झाला बघ तुझे विचार ऐकून. अगं, अशी जर कामं तुमचं मंडळ करेल तर कॉलनीतल्या साऱ्या पुरुषवर्गाचा पाठिंबा तुम्हाला मिळवून देईन याची खात्री बाळग. एक स्त्री, एका कुटुंबास जर नावारूपाला आणते तर अनेक स्त्रिया मिळून किती विधायक कार्य करू शकाल?"
"हो ना? ठरलं तर मग. मी आजच मीटिंग बोलावते ,"असं म्हणत ही आत निघून गेली.
एका रात्रीत अफलातून वैचारिक संक्रमण झालेल्या माझ्या पत्नीकडे मी 'आ' वासून पाहू लागलो. कधी एकदा साहेबांना हे सगळं सांगेन असं झालं होतं. विभागून दिलेल्या बक्षिसाचे दुसरे दावेदार, म्हणजे त्यांच्या पत्नीचेही असेच मन-परिवर्तन झाले की काय? हे जाणून घेण्याची आतुरता लागली होती.

---- सौ. माधुरी शहा, सोलापूर.



# माझी माय

''आई,आज डब्बामध्ये काय देशील?'' आमचे कुलदीपक विचारते झाले.

"अरे बाळा, तू महाराष्ट्रात जन्मलेला,मराठी मातीत वाढलेला,मराठी आई–बापाचा,मराठी मुलगा ना? मग?" 'डब्यात काय देशील?' असे म्हण ना......' मे ''तेच ते!'' इति चिरंजीव.

''अरे वत्सा, मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राष्ट्रभाषा नसे! आज ऐश्वर्य या माऊलीला,यशाची पुढे दिव्य....''

''माहित आहे . माहित आहे.'' उपहासाने मला मधेच अडवित चिरंजीव वदले. ''येवढे आहे तर व्ही टी नामकरण करताना 'छत्रपती शिवाजी' ला 'टर्मिनस' च्या इंग्रजी कुबडया कशाला लावल्या मग ? त्यापेक्षा मुबंई म्हणायचे नाहीतर बोरीबंदर चालले असते.

मी क्षणभर अवाकच झाले. माझ्या प्रिय माय मराठीला प्रिय लाडक्या लेकाने असे म्हणावे, याचे मला फार वाईट वाटले . मी म्हटले, ''हे इंग्रजी माध्यमवाल्या सुपुत्रा, मराठी साहित्यवैभवाची तुला काय कल्पना ? त्याच्या रसास्वादाच्या आनंदाला तू मुकला आहेस पारखा झाला आहेस. वाच वाच ती स्वामी. ती ययाती. छत्रपती शिवाजी. रथचक्र! झालेच तर आपली ही ती?

''अगं आई, गणितातले कंस,कर्ण,व्यास जेवढे महाभारत घडवतात तेवढे कळले तरीपुरे! हे असले काही लक्षात ठेवण्यापेक्षा एकदाच ब्रँकेट डायगोनल डायमीटर.... इ लक्षात ठेवले तर अत्यंत समृद्ध वाड्मयाच्या अलिबाबाच्या गुहेचे दार उघडायचा मंत्र अनायासेच मिळतो. मराठी आले नाही म्हणून जगात कुणाचे काही अडत नाही. भाषेची उपयुक्तता बघून भाषा शिकावी तू तरी सांग बरं मराठीत मुळाक्षरे किती आहे ते?''

खरचं , मुळाक्षरे? मराठीत मुळाक्षरे किती आहेत बरे? आपल्याला हा प्रश्न कधी का पडला नाही? मग मी जो भेटेल त्याला हा प्रश्न विचारत सुटले तेव्हा ३५ ते ४० मूळाक्षरे असण्याची विविध उत्तरे मिळाली

क,च,ट,त,प यांची यादी करताना त्यात ऋ,ॠ,ऌ ही अक्षरे धरायची की नाही? ॠ, ऌ , चा उपयोग कोणत्या शब्दांत होतो? असे शब्द कोणते व कीती? स्वरांची संख्या कीती? अ,आ,......बारा!म्हणून तर तिचे नांव बाराखडी! हो रे हो!मग ॐ हे काय आहे? स्वर की व्यंजन? बाराखडीत त्याचे स्थान कुठे आहे? सर्व स्वरांचा एकत्रित उच्चार करून होणारे महाजोडाक्षर कां?.... काही समजत नाही माझ्या तनामनावर शब्दांचे उभे आडवे वार करून चिरंजीव चालते झाले पण जाता जाता दिला भुंगा सोडून माझ्या डोक्यात ...... माझे डोके पोखरायला

आज मोठमोठ विद्वान लोक मराठीच्या उद्धारासाठी सज्ज झाले आहेत यशाची पुढे (?) दिव्य आशा असणा–या या मराठी भाषेला राजमान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त चालली आहे जागतिक पातळीवर तिचा विचार चालू आहे 'जा.म.प.' मध्ये तिच्या वैभवशाली भवितव्याची स्वप्न रंगवली जात आहेत आमची ई–मेल,कम्प्युटर,इंटरनेटमध्ये जन्मलेली तिची नातवंडे तिच्याबद्दल अनास्थेने बोलत आहेत अशा आणिबाणीच्या वेळी मराठीच्या स्वाभिमान्यांनी स्वस्थ बसायचे की काय? आपल्याला आपल्या मातृभाषेचा काही आदर आहे की नाही? ते काही नाही मी ठरवले आपणही मायमराठीची आपल्यापरीने यथाशक्ती,यथामती सेवा करायची तिच्या उद्धारासाठी प्रयत्न करायचे ठरवले म्हणजे ठरवलेच

अमृतातेही पैजा जिंकणा–या माझ्या 'माय मराठी'! तुला माझा कृतज्ञतापूर्वक मनापासून साष्टांग दंडवत माते,सांग मी तुझे पांग फेडण्यासाठी काय करू?मला मार्ग दाखव शोभादर्शक यंत्रातून बघावे अशी तुझी लोभसवाणी मनोहर रूपं! पण जरा धक्का लागला की बदलतेच चित्र!

माय, तू अगदीच कशी ग ही!

आता बघ ना !वैवाहिक जीवनाची सुरवात करण्यासाठी ज्याच्या गळयात वरमाला घालून ज्याला वरायचे त्याला म्हणायचे 'न'वरा ! तो म्हणतो नवरी कशी तर सरळ वळणाची! आता 'वळण' असेल तर ते सरळ असणारं कां ?तरीही अखेर लग्न होते वरात निघते वरातीची मोटार जाते घरावरून,देवळावरून कशाला वरात न्यायाची ? देवळासमोरून फार तर देवळामागून वरात न्यायाची......देवळाजवळून न्यायाची

लग्न होऊन आठवडा होतो. पण आठवडा म्हणजे सप्ताह = सात कां? सप्ताह आणि आठवडा दोन्ही एकच

कां? तुझ्या पंचागांत पुष्कळदा तृतीयेसह चतुर्थी येते. म्हणजे सोमवारी मंगळवार आल्यसारखे वाटते बघ. चंपाषठीचे नवरात्र असते सहा दिवसांचे, त्याला नवरात्र का म्हणायचे? म्हणजे 'तुमच्याकडे सहा इंची फूटपट्टी आहे का?' असे विचारण्यासारखे झाले.

आपले पाय आणि डोके शरीराच्या अगदी विरुद्ध दिशेला! पण चालायचे ते पायाने की डोक्याने? धावतपळत गाडी गाठण्यासाठी स्टेशनवर जावे तर गाडी वेळेवर निघून गेलेली असते. कधी काळी रेल्वे गाडया वेळेवर सुटण्याची फॅशन होती. ते गृहीत धरुन हे विधान करण्याची धाडस केले आहे. आम्ही म्हणणार, 'एक मिनिटांनी माझी गाडी चुकली.' गाडी चुकलेली नसते. चुकलेले असतो आपण. माटुंग्यानंतर दादर स्टशन येते . हे सत्य आहे पण कबूलच करायला हवे की माटुंगाही जागचे हलत नाही आणि दादरही कुठे येत नाही. मग घरा घराची वाट! हा रस्ता थेट घरापर्यंत जातो. रस्ता कसा आणि कुठे जाणार ? तो वर्षानुवर्षे तिथेच आहे. तिथेच रहाणार.

दोरीच्या उडया की उडयाची दोरी? सकाळी नळ येतो आणि तासाभरात जातो म्हणजे काय? जेवायाला पानावर बसायचे की पाटावर? डबा खायचा की त्यातले पदार्थ? अगांत शर्ट घालायचा की शर्टात अंग?पायात बूट की बूटात पाय? एखादयाची दुकान चांगले 'चालते' कसे? परोक्ष म्हणजे समक्ष की पश्चात?

व्याकरणशुद्ध मराठीत म्हणावे लागले. “मीने आंघोळीला केले." आंब्याला खाल्ले. पुस्तकाला वाचले, गाण्याला ऐकले. डॉक्टर खोकल्याचे औषध देतात. खरं त्र त्यानी खोकला 'न' येण्याचे किंवा तो जाण्याचे औषध दयायला हवे साखर मधुमेहाला चांगली नाही नेमके खोटे आणि उलटेच विधान झाले हे कारण साखर मधुमेह होण्याला चांगली आहे बिनडोक माणसाचे डोके दुखते ते कसे काय? अत्तर ठेवतात ती अत्तरदाणी,गुलाबपाणी ठेवतात ती गुलाबदाणी तर मग मच्छरदाणी?

सर्वसामान्यजनांचे दैवत पंढरपुरचा विठोबा. तो रंगाने 'काळा सावळा' गोरा नक्कीच नाही. तर त्याला म्हणायचे 'पांडुरंग'! 'सूर्य स्थिर आहे तो उगवत नाही की मावळत नाही. पृथ्वी उगवते ...असे किती सांगू?

माझे आई,गणितातही तुझे वागणे असेच आहे . एकावर एक कधी दोन तर कधी अकरा ,कधी पहिल्या एकावरच दुसरा एक गिरवला तर एकच. दोनचा पाढा म्हणजे बे चा पाढा. मग 'बेघर' म्हणजे ज्यांची दोन घरे असतात ते कां? बेजबाबदार म्हणजे दोन जबाबदा–या सांभाळणारा. एकीचे बळ म्हणजे एकटीचे की सगळ्याचे मिळून? मते,तुझ्या अंतरीच्या नाना कळा... कशा आकळाव्यात ? साधे र चे उदाहरण बघ. त्यापासून जोडाक्षरे करण्याची किती त–हा... 'श्रीः' प्रकार 'हस्व' 'चित्र' आशीर्वाद... पुन्हा सावकारी र वेगळाच... माराठीचा गंध नसणारांना हे सगळे कसे काय समजावयाचे ग ? 'ब्राम्हण विद्वान नसुन ब्राम्हण विद्वान असतात.' वनांत सिन्व्ह नसून वनांत सिंह असतो कृष्णाची प्रदन्या नसून कृष्णाची प्रज्ञा असते.

तुझ पुस्तकातले रुप आणि बोलण्यातले रुप किती निराळे? तूं आम्हा लेकरांना मराठी शिकवतांना किती दमवतेस? गोंधळात टाकतेस. हे विरोधाभास, ते नेमके उलटा अर्थ असणे, असे सगळयाच भाषेत असते का ग ? की ही तुझी दुर्बलता आहे? यांना तुझ्या खास लकबी म्हणू की तुझे सौंदर्यालंकार म्हणू? ही तुझी बलस्थाने म्हणून की वैशिष्ठये? तुझे स्वरुप म्हणू की कौतुक म्हणू? छेःछेः माझे काहीतरी चुकतेय तू खूप मोठी आहेस. तुझे थोरपण मला कळत नाही आहे. मला तुझी तक्रार करायची नाही आहे. पण मला कळत नाही की सेवा तरी कशी करु? काय करु? कां काहीच नको करु?

